cmyk

दैनिक

# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–३२४ | बुधवार, दि.१९ मार्च २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने– ६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### स्वग्रहावर परतीची तयारी

अखेर जगभरातील अंतराळ प्रेमींना ज्या आनंद वार्तेची प्रदीर्घ काळ प्रतीक्षा होती ती खरी ठरली. स्पेस एक्सचे अंतराळयान नव्या चमूसह आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकात पोहोचले आहे. याच अंतराळयानातून भारतीय वंशाच्या अमेरिकन अंतराळवीर सुनीता विलियम्स आणि बुच विल्मोर पृथ्वीवर परतणार आहेत. येत्या आठवड्याभरात त्यांच्या सुखरूप स्वग्रहावरील आगमनाची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. या वैज्ञानिकांना सुरक्षित पद्धतीने पृथ्वीवर परत आणता यावे यासाठी सर्व तांत्रिक दोष दूर करून यंत्रणा सिद्ध करण्यात आली.

## अरबी समुद्रात प्रतिकात्मक आंदोलन

मुंबई–शेतकऱ्यांचे सोयाबीन कापसाला भावफरक द्यावा, संपूर्ण कर्जमुक्ती करावी, पीक विमा यासह विविध प्रश्न घेऊन रविकांत तुपकर हे शेतकऱ्यांसह मुंबईचे अरबी समुद्रात बुधवारी सोयाबीन, कापूस आणि सातबारा बुडवून प्रतिकात्मक आंदोलन करणार होते, अशी माहिती शेतकरी नेते रविकांत तुपकर यांच्या पत्नी शर्वरी तुपकर यांनी दिली. तसेच ते मंगळवारी मुंबईकडे निघणार होते, मात्र ते भुमीगत झाले आहेत. त्यामुळे आंदोलन होते की नाही? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## थोडक्यात...

### खोक्याची ती कार पोलीस ठाण्यात

शिरुर–सतीश उर्फ खोक्या भोसलेने गुन्ह्यात वापरलेली गाडी त्याच्या मित्रांनी स्वत:हून पोलीस ठाण्यात आणली. गुन्ह्यात वापरलेली गाडी सतीश उर्फ खोक्या भोसलेच्या मित्राची असल्याची माहिती पोलीस सूत्रांनी दिली आहे. यापूर्वी पोलिसांनी सतीश उर्फ खोक्या भोसलेची एक गाडी जप्त केली आहे.

### प्रशांत कोरटकरचा जामीन नामंजूर

कोल्हापूर–सत्र न्यायालयाकडून प्रशांत कोरटकरचा जामीन नामंजूर मोठी बातमी समोर आली आहे. कोल्हापूर सत्र न्यायालयाकडून प्रशांत कोरटकरचा जामीन नामंजूर करण्यात आला आहे. त्यामुळे प्रशांत कोरटकरला कोणत्याही क्षणी अटक होण्याची शक्यता आहे. छत्रपती शिवाजी महाराजांबाबत आक्षेपार्ह वक्तव्याप्रकरणी कोरटकरवर कारवाई केली जाणार आहे.

### राज्यात पोलीस अलर्ट मोडवर

मुंबई–औरंगजेब कबरी संदर्भात नागपूर शहरातील झालेल्या घटनेनंतर राज्यभर पोलीस अलर्ट मोडवर आले आहे. संवेदनशील शहर म्हणून ओळखले जाणाऱ्या मालेगावात शांतता आहे. मालेगावात सोमवारी हिंदुत्ववादी संघटनांनी आंदोलन केले होते.

### हिंसाचारात जखमी डीसीपी निकेत कदमांना डिस्चार्ज

नागपूर–हिंसाचार प्रकरणात जखमी झालेले झोन ५ चे डीसीपी निकेत कदम यांना दिलाय डिस्चार्ज देण्यात आला आहे. नागपूरच्या न्यूइरा रुग्णालयातून त्यांच्यावर उपचार करण्यात आले. डीसीपी निकेत कदम यांच्यावर दगडफेक सुरू असताना कुऱ्हाडीने हल्ला झाला होता. त्यानंतर डीसीपी कदम यांच्या हातावर करण्यात शस्त्रक्रिया करण्यात आली. त्यानंतर आता डीसीपी कदम यांना १५ दिवस विश्रांतीचा सल्ला देण्यात आला आहे.

### नागपूरमध्ये नियोजनबद्ध हिंसाचार–विहिंप

नागपुर–नागपूरमधील हिंसाचार हा नियोजनबद्ध होता. औरंगजेबला मानणारे लोक अजूनही अस्तित्वात आहेत, असे दिसून येत असल्याचे विश्व हिंदू परिषदेने नागपुरात सांगितले.

### औरंगजेबची कबर इकडे अन् दंगल तिकडे–जरांगे

जालना–मुघल सम्राट औरंगजेबाच्या कबरीवरुन सध्या वाद सुरु आहे. महाराष्ट्रात असलेली औरंगजेबाची कबर हटवण्याची मागणी केली जात आहे. यावर मनोज जरांगे पाटील यांनी, 'औरंगजेबाची कबर निवडणुका आल्यास उकरून काढायचे काम सुरु आहे. समजाने सावध रहा. रहे सर्व कावे आहेत. औरंगजेबची कबर संभाजीनगरला आणि दंगल होतात नागपूरमध्ये' असे म्हटले आहे.

### नागपूरमध्ये पेट्रोल बॉम्ब आणले कुठून ? –शिंदे

मुंबई–नागपूरमध्ये घटना घडल्यानंतर दुपारी पोलिसांनी सर्व शांत केले. मात्र रात्री चार–पाच हजार लोक कसे येतात. हॉस्पिटल वरती दगडफेक केली, हॉस्पिटल मधील देवदेवतांचे फोटो जाळण्यात आले. पेट्रोल बॉम्ब आणले कुठून? असा एकनाथ शिंदेंनी सवाल उपस्थित केला आहे. गेल्या काही दिवसांपासून औरंगजेबीचे उदात्तीकरण सुरु आहे. अबू आझमी यांनी तुलना केली होती, त्यांना समज दिली होती, असेही शिंदे म्हणाले.

# शेतमजुरांसह बटाईदारांनाही मिळणार शेती योजनांचा लाभ

**शेतकरी ओळख पत्र देण्याचे राज्य सरकारांना निर्देश; कृषिमंत्र्यांची संसदेत माहिती**

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

**डिजिटल कृषी मिशनच्या अंतर्गत देशातील शेतकऱ्यांना कर्ज, हमीभाव खरेदी, नुकसान भरपाई यासारख्या सुविधा तातडीने उपलब्ध करून देण्यासाठी शेतकरी ओळख पत्र म्हणजेच फार्मर आयडी देण्यात येत आहेत. यामध्ये भाडेतत्वावर शेती कसणाऱ्या मजुरांचा समावेश करण्याचे निर्देश राज्य सरकारांना दिलेले आहेत, अशी माहिती केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी मंगळवारी (दि.१८) संसदेत दिली.**



प्रश्नोत्तराच्या तासात शेतमजुरांना फार्मर आयडी देणार का, असा प्रश्न भाजप खासदार डॉ. पुरंदेस्वारी यांनी उपस्थित केला. त्यावर कृषिमंत्री चौहान यांनी सभागृहात माहिती दिली. कृषिमंत्री म्हणाले, ''जे शेतकरी दुर्गम भागातील आहेत. त्या शेतकऱ्यांचे फार्मर आयडी

पान २ वर

### केंद्र सरकार उचलते खर्चाचा भार

केंद्र सरकार एका फार्मर आयडीसाठी राज्य सरकारला १५ रुपये देते. तसेच राज्य सरकारला फार्मर आयडी रजिस्ट्रेशनसाठी शिबिर आयोजित करण्यासाठी १५ हजार रुपये दिले जातात, अशी माहिती कृषिमंत्र्यांनी संसदेत दिली आहे. याचा अर्थ शेतकरी ओळख पत्राच्या खर्चाचा भार हा केंद्र सरकार उचलीत आहे.

## कृषिमंत्री माणिकराव कोकाटेंची अपात्रता तूर्त टळली

**नाशिक । प्रतिनिधी**

कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांच्यासह त्यांचे भाऊ विजय कोकाटे यांचा शिक्षेचा खटला चर्चेत आहे. सरकारी सदनिका लाटल्याच्या प्रकरणात नाशिक येथील दंडाधिकारी न्यायालयाने कोकाटे यांना २ वर्षांची शिक्षा आणि ५० हजारांचा दंड ठोठवला. यावर सत्र न्यायालयाच्या निर्णयात उच्च न्यायालयानेही मंगळवारी (दि.१८) यावर स्थगिती दिली आहे. पुढील सुनावणी २१ एप्रिल रोजी ठेवण्यात आली आहे. मुंबई हायकोर्टाच्या निर्णयाने मंत्री कोकाटे यांच्यावरील अपात्रतेच्या कारवाईला तुर्तास दिलासा मिळाला आहे. मुंबई



हायकोर्टातील न्यायमूर्ती आर. एन. लड्डा यांच्या खंडपीठासमोर याचिकेची सुनावणी झाली. यावेळी, अंजली राठोड या प्रकरणात तक्रारदार नसल्याने ही याचिका करण्याचा त्यांना अधिकार नाही. तसेच त्यांची याचिका ऐकण्यायोग्य नाही, असे कोकाटे यांच्याकडून न्यायालयाला


पान २ वर

## मल्टीस्टेटमधील ठेवीदारांच्या ठेवी मिळण्याची आशा पल्लवित

# कुटेंच्या ६ हजार कोटींच्या संपत्तीचा लिलाव होणार

**मुख्यमंत्री फडणवीसांनी केली मोठी घोषणा; आ.प्रकाश सोळंकेंनी मांडला मुद्दा**





**मुंबई । प्रतिनिधी**

**बीड येथील ज्ञानराधा मल्टीस्टेटमध्ये ठेवीदारांचे ११०० कोटी रुपये अडकले असून त्यामुळे अनेकांनी आतापर्यंत आत्महत्या देखील केल्या आहेत. ठेवीदारांना ठेवी मिळाव्यात यासाठी आ. प्रकाश सोळंके यांनी अधिवेशनात महत्वाचा मुद्दा मांडला. त्यावर बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मोठी घोषणा केली असून ज्ञानराधाचे सुरेश कुटे यांची ६ हजार कोटींची संपत्ती लिलाव करण्याची प्रक्रिया लवकरच करण्यात येणार आहे. त्यातून मिळणाऱ्या पैशातून ठेवीदारांच्या ठेवी दिल्या जाणार असल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली. त्यामुळे मल्टीस्टेटमध्ये अडकलेल्या ठेवी मिळण्याची आशा आता पल्लवित झाली आहे.**




### कुटेंच्या संपत्तीचा लवकरच लिलाव

सुरेश कुटेंची ६ हजार कोटींची संपत्ती सध्या सिल करण्यात आली असून ठेवीदारांना ११०० कोटी रुपये देणे आवश्यक आहे. संपत्ती जप्त करुन तीचा लिलाव करून त्यातून ठेवीदारांना पैसे देण्याबाबत केंद्र सरकारची परवानगी मिळाली असून लवकरच ती संपत्ती लिलाव करण्याची प्रक्रिया करण्यात येणार असल्याची माहिती मुख्यमंत्र्यांनी विधानसभेत दिली.

### मल्टीस्टेटच्या ठेवींना विमा कवच मिळवण्यासाठी प्रयत्न

बँकांमधील ठेवीदारांच्या ५ लाखापर्यंतच्या ठेवी या सुरक्षित असतात. याबाबत महाराष्ट्र सरकारने विमा कवच देण्याचा कायदा केला आहे. असाच कायदा आता मल्टीस्टेट, पतसंस्थाबाबत करण्याची मागणी लवकरच केंद्र सरकारकडे केली जाणार असल्याची माहिती फडणवीसांनी यावेळी दिली. तसा कायदा झाला तर ज्ञानराधासह इतर मल्टीस्टेटमधील ठेवीदारांच्या ५ लाखापर्यंतच्या ठेवींना विम्याचे संरक्षण मिळण्याचा मार्ग मोकळा होऊ शकेल.

मराठवाड्यातील ज्ञानराधा मल्टीस्टेट, साईनाथ मल्टीस्टेट, राजस्थानी मल्टीस्टेट, माँसाहेब जिजाऊ मल्टीस्टेट यासह आणखी काही मल्टीस्टेटमध्ये ठेवीदारांचे हजारो कोटी रुपयांच्या ठेवी अडकल्या आहेत. बरेच चेअरमन आणि संचालक हे सध्या जेलमध्ये आहेत. ठेवी मिळत नसल्याने अनेकांनी आतापर्यंत आत्महत्या केल्या असून अनेक मुलींचे लग्न सुध्दा पुढे ढकलावे लागले आहे. आ. प्रकाश सोळंके यांनी ठेवीदारांना ठेवी कधी मिळणार? हे शासनाने जाहीर करावे यासह काही महत्वाचे मुद्दे अधिवेशनात मांडले. त्यावर बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी सांगितले की, ज्ञानराधा मल्टीस्टेटचे सुरेश कुटे हे जेलमध्ये असून आतापर्यंत त्यांची ६ हजार कोटी

पान २ वर

## निकाल लागला तरी महापालिका निवडणुका पावसाळ्यानंतरच?

**तयारीसाठी लागणार १०० दिवस; इच्छुकांचा जीव टांगणीला**



**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील महापालिका निवडणुका येत्या ऑक्टोबर महिन्यानंतर होण्याची शक्यता आहे. मुंबई महापालिका निवडणुकीबाबत सुप्रीम कोर्टात ४ मे रोजी सुनावणी आहे. सुनावणीनंतर निकाल लागला तरी निवडणुकीची तयारीसाठी सुमारे १०० दिवस लागतील, त्यामुळे पावसाळ्यापूर्वी निवडणुका होण्याची शक्यता कमी आहे. परिणामी इच्छुकांचा जीव मात्र टांगणीला लागला आहे.

महाराष्ट्रात लोकसभा निवडणुकीनंतर विधानसभा निवडणुका पार पडल्या. विधानसभा निवडणुकांचा निकाल नोव्हेंबरमध्ये लागला होता. या निवडणुकीनंतर आता महापालिका निवडणूक कधी लागणार याकडे सर्वांचेच लक्ष लागलं आहे. आता सर्वच पक्षांकडून महापालिका निवडणुकांची तयारी केली जात आहे. त्यातच सध्या राज्यात महापालिका निवडणुकांचे वारे वाहू लागले आहेत. राज्यातील

पान २ वर

## राज्यात नदी पुनरुज्जीवनासाठी महत्त्वाकांक्षी योजना आणणार

**पर्यावरण व वातावरण बदल मंत्री पंकजा मुंडे यांची माहिती**

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील नद्या प्रदूषणमुक्त करण्याकरिता गुणवत्तापूर्ण काम करून नदी पुनरुज्जीवनासाठी महत्त्वाकांक्षी योजना आणण्यात येणार असल्याचे पर्यावरण व वातावरण बदल मंत्री पंकजा मुंडे यांनी विधानपरिषदेत सांगितले. सदस्य उमा खापरे यांनी नदी पुनरुज्जीवनाविषयी लक्षवेधी सूचना मांडली होती. त्यास उत्तर देताना मंत्री पंकजा मुंडे बोलत होत्या.



पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे

म्हणाल्या, नगरपालिका, महानगरपालिका आणि नगरपरिषद यांच्यासोबत बैठक घेऊन महत्त्वाचे निर्णय घेतले जातील. पर्यावरण नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर चौकशी करून कठोर कारवाई केली जाईल. केलेल्या कामांचे थर्ड पार्टी ऑडिट केले जाईल. राज्यातील नद्यांचे संवर्धन आणि प्रदूषण कमी करण्यासाठी प्रभावी

पान २ वर

# बोले तैसे चाले..एकनाथ शिंदेंनी शब्द पाळला!

**संतोष देशमुखांच्या पक्क्या घराची वीट रचली; चार महिन्यात तयार होणार घर**

**बीड । प्रतिनिधी**

**संतोष देशमुख यांच्या हत्येने अवघा महाराष्ट्र हळहळला हळहळला, राज्यभर या घटनेचे पडसाद उमटले. असंख्य नागरीकांनी देशमुख कुटुंबाला मदतीचा हात दिला. माजी मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सुध्दा स्व. संतोष देशमुख यांच्या कुटुंबासाठी पक्के घर बांधून देण्याचा शब्द दिला होता. बोले तैसे चाले.. या प्रमाणे शिंदे यांनी शब्द पाळला असून देशमुखांच्या पक्क्या घराची पहिली वीट ही मंगळवारी महंतांच्या शुभहस्ते रचण्यात आली आहे. आता तीन ते चार महिन्यात घर बांधून पुर्ण होणार आहे.**



सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येने संपूर्ण महाराष्ट्र हादरला. खंडणी अपहरण ते निर्घृण हत्या प्रकरणात संतोष देशमुखांना संपवताना आरोपींनी आनंदोत्सव साजरा केलेल्या चित्रफिती समोर आल्या आणि राज्यभरात संतापाची लाट उसळली होती. ९ डिसेंबरला आपल्या कुटुंबातील करत्या पुरुषाची हत्या झाल्याचे समजताच कुटुंबीयांच्या आक्रोशाने मस्साजोग हादरले होते. आपल्या गावातील ग्रामस्थांचे घर पक्के असेल तेव्हाच मी स्वतः घर बांधेन असा संकल्प सरपंच संतोष देशमुख यांचा होता. मात्र शेवटची त्यांची इच्छा अपूर्णच राहिल्याचे कुटुंबाकडून कळताच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी संतोष देशमुख यांच्या कुटुंबीयांना पक्क्या घराचा शब्द दिला होता. पुढील तीन ते चार महिन्यात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या संकल्पनेतील देशमुख कुटुंबाचे घर तयार होणार असल्याची माहिती शिंदे गट माजी जिल्हाप्रमुख अनिल जगताप यांनी दिली होती.अखेर उपमुख्यमंत्री यांच्या संकल्पनेतून देशमुख यांच्या घराचे भूमिपूजन जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, अनिल

पान २ वर

### एकनाथ शिंदेप्रमाणे इतर नेत्यांना सुचत का नाही?

संतोष देशमुख यांच्या कुटुंबियांच्या मदतीला एकनाथ शिंदे धावून आले असून त्यांनी पक्के घर बांधण्यासाठी पुढाकार घेतला आहे. आता राज्यातील इतर नेत्यांनी सुध्दा गरजू व पिडीत कुटुंबाच्या मदतीला धावून जात त्यांना सुध्दा पक्के घर, मुलांचे शिक्षण, मुलींचे लग्न यासाठी पुढाकार घेण्याची गरज आहे.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१८ मार्च २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: १८१.५० क्विंटल | २,००० | २,९५१ | २,५५८ |
| ज्वारी/हायब्रिडः २७२.५० क्विंटल | १,६०१ | ३,३४५ | २,२९७ |
| मका/लोकल:३५.०० क्विंटल | २,०९० | २,११० | २,१०० |
| तूर : १४.०० क्विंटल | ६,७०० | ६,९०० | ६,८३१ |
| उडीद : ६.०० क्विंटल | ५,४०० | ५,४०० | ५,४०० |
| बाजरी: ५०.५० क्विंटल | २,२०१ | २,९५० | २,७३४ |
| मुग :४.५० क्विंटल | ६,५०१ | ७,४५१ | ६,९७६ |
| सोयाबीन: ३४.०० क्विंटल | ३,८०० | ४,००० | ३,९०० |
| हरभरा: ४९.०० क्विंटल | ४,९०० | ६,००० | ५,०६९ |

## अपेकच्या अंदाजानुसार यंदा मॉन्सून हंगाम चांगला जाणार!

**आता पुढच्या महिन्यात येणाऱ्या हवामानशास्त्र विभागाच्या अंदाजाची प्रतिक्षा**



**नवी दिल्ली । वृतसंस्था**

दक्षिण कोरियाच्या अपेक हवामान केंद्राने पुढील मॉन्सून हंगामात देशात सरासरी ते सरासरीपेक्षा अधिक पावसाचे संकेत दिले आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांसाठी दिलासादायक संकेत मिळू लागले आहेत. परंतु पुढच्या महिन्यात हवामानशास्त्र विभाग मॉन्सूनचा पहिला अंदाज व्यक्त करेल, त्यानंतर मॉन्सूनच्या पावसाबद्दल अधिक स्पष्टता येईल,

पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# स्वग्रहावर परतीची तयारी

अखेर जगभरातील अंतराळ प्रेमींना ज्या आनंद वार्तेची प्रदीर्घ काळ प्रतीक्षा होती ती खरी ठरली. स्पेस एक्सचे अंतराळयान नव्या चमूसह आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकात पोहोचले आहे. याच अंतराळयानातून भारतीय वंशाच्या अमेरिकन अंतराळवीर सुनीता विलियम्स आणि बुच विल्मोर पृथ्वीवर परतणार आहेत. येत्या आठवड्याभरात त्यांच्या सुखरूप स्वग्रहावरील आगमनाची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. या वैज्ञानिकांना सुरक्षित पद्धतीने पृथ्वीवर परत आणता यावे यासाठी सर्व तांत्रिक दोष दूर करून यंत्रणा सिद्ध करण्यात आली. त्यानंतर आता त्यांचा परतीचा मार्ग सुकर होण्यास सुरुवात होणार आहे. सुनीता विल्यम्स आणि बुच विल्मोर हे दोन अंतराळवीर फक्त आठ दिवसांसाठी आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकात गेले होते. मात्र यानात तांत्रिक बिघाड झाल्यामुळे ते दोघेही तिथे नऊ महिन्यांपासून अडकले आहेत. या दरम्यान तेथे राहून त्यांनी जबरदस्त कामगिरी केली आहे. त्यांना व्यक्तीश: गेले नऊ महिने या स्थानकावर अडकून पडून आपल्या प्रकृतीपासून कौटुंबिक क्षणापर्यंत अनेक बाबतीत ताण, कष्ट आणि त्रास सोसावे लागले असतील. मात्र त्यांच्या प्रदीर्घकाळाच्या उपस्थितीमुळे संकलित झालेली माहिती सुद्धा या क्षेत्रातील प्रगतीसाठी खूप महत्त्वाची ठरणार आहे.

ही एक चांगली बाजू असली तरी याच प्रकरणाला लागलेली एक दुर्दैवी किनारदेखील सर्वसामान्यांना अस्वस्थ करणारी आहे. अडकून पडलेल्या अंतराळवीरांना स्वग्रहावर आणण्यासाठी उठलेले वादळ अमेरिकन अध्यक्षपदाच्या निवडणुकीवर सुध्दा परिणाम करून गेले हे विसरता येणार नाही. केवळ राजकीय कारणामुळे ते तिथे अडकून पडलेत असा थेट हल्ला ट्रम्प यांनी केला होता. या समस्येला बायडन हेच जबाबदार आहेत असेही म्हटले होते. तर पत्रकार परिषदेत स्पेस एक्सचे कार्यकारी प्रमुख एलॉन मस्क आणि ट्रम्प यांनी दिलेल्या मुलाखतीत आपण लवकरच सुनीता विल्यम्स यांना पृथ्वीवर परत आणू असे आश्वासन दिले होते. ज्यावेळी हा वाद सुरू होता तेव्हा हे अंतराळवीर अवकाशात पोहोचणारी कंपनी बोइंगने आपले यान सुस्थितीत असल्याचा वारंवार दावा केला होता. तर नासा आपल्या वैज्ञानिकांना सुरक्षित पृथ्वीवर आणण्यासाठी आग्रही होता. त्यात जवळपास पावणे तीनशे दिवस हा विषय गाजत राहिला. आता यापुढे यात जे घडेल ते एक मोठे राजकारणही असेल. कारण बोईंगच्या प्रतिस्पर्ध्याकडून या अंतराळवीरांना पृथ्वीवर आणले जाणार आहे. त्याचे मोठे परिणाम बोईंगवर होणार आहेत. या घटनेमुळे संकट काळात देखील कसे राजकारण पेटवले जाते याविषयी अमेरिकी अवतार भारतीयांना पहायला मिळाला असेही म्हणता येईल. त्यामुळे नऊ महिन्यानंतर स्पेस एक्स क्रू ड्रॅगन आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकाला जोडले जाताना आणि हॅच ओपन होतानाचे लाईव्ह फुटेज आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानक, नासा आणि स्पेसएक्स यांनी सोशल मीडियावर दाखवले ते जगभर प्रचंड वेगाने प्रसारित देखील झाले.

जून २०२४ मध्ये स्टारलायनर अंतराळयानातून बुच आणि सुनीता यांना आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर पोहोचले होते. यानात तांत्रिक बिघाड झाल्यामुळे अंतराळ मोहिमेत आधीच अनेक वर्षांचा उशीर झाला. या यानाला अंतराळात पाठवण्याच्या वेळेस अनेक समस्या येत होत्या. यात नासाच्या मते अशाही समस्या होत्या ज्यांचा परिणाम पृथ्वीच्या वातावरणात प्रवेश करताना झाला असता. यामध्ये हेलियम वायूच्या गळतीची समस्यादेखील होती. त्यामुळे नासाने निर्णय घेतला होता की सुनीता आणि बुच यांच्या पृथ्वीवरील परतीच्या प्रवासात थोडीदेखील जोखीम घेतली जाणार नाही.

दोन दिवसानंतर वैज्ञानिकांचा परतीचा प्रवास सुरू होईल आणि जगाची नजर त्यांच्या सुखरूपतेकडे लागेल. काही जाणकारांच्या मते अंतराळवीरांच्या परतीच्या प्रवासाला अजूनही थोडा उशीर होऊ शकतो. कारण हवामान अनुकूल आहे किंवा नाही याची खात्री करून पुढची वाटचाल होणार आहे.

## २३ कोटीच्या झालेल्या कामाची चौकशीसाठी उपोषण

जालना । प्रतिनिधी

**परतुर तालुक्यातील अकोली हे गाव एक हजार लोक वस्तीचे गाव. परंतु या गावात झालेले विकास कामांच्या निधी २३ कोटीचा विकास कामासाठी खर्च . पाच वर्षांमध्ये या गावात तब्बल २३ कोटींची विकास कामे झाल्याचा दावा गावातीलच काही नागरिकांनी केला आहे .परंतु ही कामे केवळ कागदोपत्री झाली आहेत असा आरोप केल्यामुळे सोमवार दिनांक १७ मार्च पासून जालना जिल्हा परिषदेसमोर पाच ग्रामस्थांनी उपोषण सुरू केले आहे. याउलट गावातील विकास कामांबद्दल तत्कालीन जालना जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी वर्षा मीना यांनी कौतुक केल्याचे बोलल्या जात आहे.**

हजार लोक वस्तीमध्ये जर २३ कोटींची विकास कामे होत असतील तर निश्चितच हे गाव पाहण्यासाठी परिसरातील लोकांनी यावं आणि या गावाचा विकास कसा झाला ते लक्षात येईल. परंतु उपोषणाला बसलेल्या उपोषणकर्त्यांनी केलेले आरोप जर लक्षात घेतले तर या आरोपानुसार, मातोश्री पानंद रस्ते तीन कोटी रुपये, नाला पुनर्जीवन ५६ लाख ८२ हजार रुपये, रेन वॉटर हार्वेस्टिंग एक लाख ९० हजार रुपये, सिमेंट रस्ते व पेव्हर ब्लॉक दोन कोटी वीस लाख रुपये, भूमिगत गटार ३० लाख रुपये, वैयक्तिक लाभ शेततळे दीड कोटी रुपये, सिंचन विहिरी वैयक्तिक लाभ तीन कोटी रुपये, १५ वा वित्त आयोग ४० लाख रुपये आणि जन सुविधा अंतर्गत सिमेंट रस्ते ३० लाख रुपये असे सुमारे २३ कोटी ६५ लाख रुपयांची कामे कागदपत्रे झाल्याचा आरोप उपोषणार्थ्यांनी केला आहे. आणि चौकशी करण्यासाठी हे उपोषण सुरू करण्यात आलं

# नवीन रेल्वे, राष्ट्रीय महामार्गाच्या कामांना गती द्या

### खा.बजरंग सोनवणे यांच्या मुंबईतील बैठकीत अधिकाऱ्यांना सुचना, दोन्ही विभागाकडून घेतला आढावा

बीड । प्रतिनिधी

**अहिल्यानगर-बीड-परळी रेल्वेमार्ग, धाराशिव-बीड-छत्रपती संभाजी नगर या नवीन रेल्वे मार्गासाठी अंतिम स्थान सर्व्हेक्षणाला निधी देण्यात आला असून सर्व्हेक्षणाच्या कामाला गती द्या, राष्ट्रीय महामार्गाचे अर्धवट असलेली कामे तातडीने पुर्ण करा, नवीन दोन रस्ते दर्जोन्नत करुन राष्ट्रीय महामार्ग करावेत अशा सुचना खा.बजरंग सोनवणे यांनी दिल्या.**



दि.१७ मार्च रोजी दिल्ली येथील संसदेत बीड रेल्वे जंक्शन व रेलमार्ग कामांनी गती देण्यासाठी आवाज उठविला होता. यानंतर दि.१८ रोजी सरव्यवस्थापक कार्यालय, सीएसटी मुंबई येथे खा.बजरंग सोनवणे यांच्या उपस्थितीत अधिकाऱ्यांसमवेत बैठक संपन्न झाली. यावेळी ते बोलत होते. बैठकीला सरव्यवस्थापक धरमवीर मीना, एस.एसगुप्ता, ए.के.पांडे, सीपीआरओ स्वप्नील निला, डीजीएम के.के.मिश्रा यांची उपस्थिती होती. यावेळी अश्विनी वैष्णव यांनी धाराशिव-बीड-छत्रपती संभाजी नगर या नवीन रेल्वे मार्गासाठी अंतिम स्थान सर्व्हेक्षणाला निधी दिला असून आता तातडीने सर्व्हेक्षणाचे काम सुरू करावे, अहिल्यानगर- बीड- परळी रेल्वेचे काम सुरू आहे. आता अहिल्यानगर ते बीडपर्यंत रेल्वेची जलदगती चाचणी झालेली आहे. तर पुढील कामाला गती देऊन लवकरात लवकर परळीपर्यंतचे काम पुर्ण करावे, अहमदनगर-बीड-परळी रेल्वे मार्गाच्या कामामुळे काकडवाडी, सोलापूरवाडी, धानोरा, कडा, कारेगाव, विघनवाडी, हिवरसिंगा, चऱ्हाटा, ढोलेवस्ती आणि इतर ठिकाणी सडक वाहतूक बाधित झाली आहे. त्यामुळे शालेय विद्यार्थी, वृद्ध आणि प्रवाशांना अडचणी येत आहेत. यासाठी या ठिकाणी तसेच बीड-परळी मार्गावरील आवश्यक ठिकाणी पुल बांधण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी कार्यवाही करावी, अशा सुचना दिल्या तर राष्ट्रीय महामार्ग विभागाच्या बैठकीत केंद्रीय दळणवळण विभागाचे विभागीय अधिकारी फेगडे यांचेसह राष्ट्रीय महामार्ग विभागाचे सर्व मुख्य अभियंते, कार्यकारी अभियंते व संबंधित अधिकारी उपस्थित होते. यावेळी अहमदपूर-धायगुडा पिंपळा-अंबाजोगाई-लोखंडी सावरगाव-केज-मांजरसुंबा या मार्गाला दुहेरी मार्ग करणे, लातूर-बर्दापूर-लोखंडी सावरगाव या मार्गासही दुहेरी मार्ग करणे, परतूर-माजलगाव-धारूर-केज-कळंब- येरमाळा-कुसळंब या मार्गातील अर्धवट कामे पुर्ण करणे, खरवंडी- आर्वी-ब्र. येळंब- न. राजुरी-बीड- वडवणी-परळी रस्ता पूर्ण करुन सुधारणा करणे, मांजरसुंबा ते चुंबळीफाटा मार्गातील अडथळे योग्य त्या उपाययोजना पुर्ण करून काम पुर्ण करणे, पैठण- पंढरपूर रा.मा. मधील मळेकरवाडी घाटामधे तातडीने डांबरीकरण करणे, चुंभळी व पाटोदा येथील अडथळे दूर करुन कामे पूर्ण करणे आदि विषयावर सविस्तर चर्चा झाली.

**या मार्गांना दर्जोन्नतीचा प्रस्ताव**

पिठ्ठी-लिंबादेवी-गारमाथा-अंमळनेर-धामनगाव-टाकळी काझी, तर दुसरा उमापूर फाटा ते उमापूर-शेवगाव या दोन मार्गांना दर्जेन्नती करणे, या विषयावर बैठकीत चर्चा झाली असून या कामासाठी अधिकाऱ्यांनी सदरील प्रक्रिया राबविण्यास सुरूवात करू, असे म्हटले. दोन्ही मार्गावर वाहनांची मोठी वर्दळ असते.

**धारूर घाटावर फोकस**

धारूर घाटात अनेक अपघात होऊन प्रवाशांचे बळी गेलेले आहेत. सदरील घाटाचे काम व्हावे, यासाठी खा.बजरंग सोनवणे वारंवार पाठपुरावा करत असून या घाटासी पर्यायी मार्ग कामाला मंजूरी मिळालेली असून तातडीने निवीदा प्रक्रिया पुर्ण करावी आणि कामाला सुरूवात करून काम पुर्ण करावे, याबाबतही अधिकाऱ्यांना बैठकीत सुचना दिल्या.

## परतूरचं आरोग्यवर्धिनी केंद्र वैद्यकीय अधिकाऱ्यांविना कंत्राटी कर्मचाऱ्यांचा पगार रखडल्या

जालना । प्रतिनिधी

**रेल्वे मार्गावरील परतूर शहरातील महाराष्ट्र शासनाच्या नागरी आरोग्यवर्धिनी केंद्रात मागील सहा महिन्यांपासून रुग्ण तपासणीसाठी वैद्यकीय अधिकारीच फिरकाना तर, या ठिकाणी कार्यरत असलेल्या कंत्राटीसह इतर कर्मचारी चार महिन्यांपासून पगारी रखडल्या. त्यामुळे शासनाच्या या योजनेचा बोजवारा उडत आहे. सरकारची व शासनाची बदनामी थांबण्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी याकडे लक्ष द्यावे, अशी मागणी रुग्णांकडून करण्यात येत आहे.**

महाराष्ट्र शासनाच्या वतीने परतूर शहरात वाढत्या लोकसंख्येमुळे दोन नागरी आरोग्यवर्धिनी केंद्र सुरू केले आहेत. एक गाव भागात, तर एक मोंढा भागात आहे. गाव भागातील आरोग्यवर्धिनी केंद्रात मागील सहा महिन्यांपासून वैद्यकीय अधिकारी नसल्यामुळे रुग्णांना कोण तपासणार असा सवाल उपस्थित होत आहे. या ठिकाणी कार्यरत असलेल्या १५ ते २० कंत्राटी कर्मचाऱ्यांना चार महिन्यांपासून पगार नसल्यामुळे त्यांच्यावरही उपासमारीची वेळ आली आहे. या केंद्रात वैद्यकीय अधिकारी नसल्यामुळे कर्मचाऱ्यांवर ही कोणाचा वचक राहिला नाही. या केंद्रात केवळ नावालाच एक ते दोन कर्मचारी हजर राहतात. त्यामुळे उपचार घेण्यासाठी येणारे रुग्णही विना उपचार घेताच परत जात आहेत. या ठिकाणी वैद्यकीय अधिकारी नसल्यामुळे तात्पुरती ठेवण्यात आलेली औषधीही कालबाह्य होण्याच्या मार्गावर आहे.

## जिल्हाधिकाऱ्यांच्या लेखी आश्वासननानंतर जलसंधारण विभागाची जप्ती टळली!

जालना । प्रतिनिधी

**देवी दहेगाव तांडा ता. घनसावंगी येथील पाझर तलावासाठी संपादीत केलेल्या जमीनीचा न्यायालयाने वाढीव मोबदला मंजूर केल्यानंतरही मोबदला देण्यास टाळाटाळ कळणाऱ्या जिल्हा प्रशासनावर न्यायालयाच्या आदेशानुसार जप्ती ची नामुष्की ओढावली होती. तथापि मंगळवारी ( ता. १८) जिल्हाधिकाऱ्यांनी दिलेल्या लेखी आश्वासनानंतर जप्तीचे संकट टळले.**

वाढीव मोबदला मिळण्यासाठी देवी दहेगाव तांडा येथील या शेतकऱ्यांनी ॲड. भाग्यश्री मॅडम यांच्या मार्फत अंबड येथील दिवाणी न्यायालयात सन २०१६ साली दावा दाखल केला. सदर दावा मंजूर झाला.तथापि सदरील रक्कम हस्तगत करण्यासाठी शेतकऱ्यांनी पुन्हा न्यायालयात धाव घेतली. न्यायालयाने दि. १५ मार्च २०२५ रोजी जिल्हाधिकारी आणि कार्यकारी अभियंता लघु पाटबंधारे विभाग स्थानिक स्तर यांचे शासकीय वाहन, खुर्ची,संगणक संच, कार्यालयातील वीस खुर्च्या ,पाच टेबल, पाच कपाट, झेरॉक्स मशीन जप्ती चे आदेश दिले होते. त्याअनुषंगाने मंगळवारी न्यायालयीन कर्मचारी,व शेतकरी, ह्या जप्तीसाठी जिल्हाधिकारी यांच्या दालनात गेल्या असता जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी चर्चा करून वरिष्ठ कार्यालयास पंधरा दिवसांच्या आत निधी मागणीचा प्रस्ताव तयार करून पाठविण्यात येत आहे. वरिष्ठ कार्यालयाकडून निधी प्राप्त होताच न्यायालयात निधी लवकर जमा करण्यात येईल .असे लेखी आश्वासन दिले. त्यानंतर जप्ती थांबवण्यात आली.

## अंबड लघुपाटबंधारे विभागाचा अभियंताला लाच घेताना पकडलं

जालना । प्रतिनिधी

**लघुपाटबंधारे विभाग जिल्हा परिषद अंतर्गत अंबड पाटबंधारे विभागाचा अभियंता यांनी एका जणाकडून ४५ हजारांची लाच घेतांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहाथ पकडले आहे.**

वरिल विषयी सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार जालन्यातील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने अंबड येथील लघु पाटबंधारे विभागाच्या अभियंता मुजाहेद शेख याला ४५ हजारांची लाच घेताना रंगेहाथ पकडले आहे. अभियंता शेख यांची अंबड येथे पहिलीच प्रतिनियुक्ती असल्याचे बोलल्या जात आहे. अभियंता शेख यांनी एका कंत्राटदाराने मार्च एन्डच्या आधी त्याचे बिले काढण्यासाठी या रकमेची मागणी केली गेली होती. ही कारवाई जालना शहरातील विशाल कॉर्नर, संभाजीनगर चौफुली येथे करण्यात आली. जालना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने या प्रकरणात पुढील तपास सुरू केला आहे. आरोपीच्या विरोधात कायदेशीर प्रक्रिया सुरू असून, लाचलुचपत प्रतिबंधक कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया रात्री उशिरापर्यंत सुरू होती.

# अंगणवाडी भरती प्रकरणी महिलेचा मला बाळासह उपोषण सुरू

### जि.प चे मुख्य कार्यकारी यांनी लक्ष घालावे




जालना । प्रतिनिधी

अंबड महिला व बाल विकास अधिकारी कर्मचारी विभागाच्या अंतर्गत झालेल्या अंगणवाडीच्या मदतनीस पदासाठी मोठा घोळ व भ्रष्टाचार झाला. याप्रकरणी चौकशी करण्यासाठी अंबड येथे महिला व बालविकास कार्यासमोर तक्रारदार महिलांनी मला बाळासह दि १७ मार्चपासून उपोषण सुरू करण्यात आला आहे त्याचे दखल आजपर्यंत कोणत्याही कर्मचारी अधिकाऱ्यांनी घेतली जोपर्यंत न्याय मिळणार नाही त्यापर्यंत उपोषण सोडणार नाही असा ठोस निर्णय उपोषण करते महिलेने घेतला आहे. सात आठ दिवसापूर्वी बालविकास प्रकल्प अधिकारी व जिल्हाधिकारी जालना. पंचायत समिती अंबड यांना पात्र देण्यात आले होते परंतु याची कोणतीही चौकशी न करता काहीच कारवाई केली नाही म्हणून उपोषण बसण्याचा वेळ सदरील माझ्यावर आला आहे. सदरील प्रकरणी लाभार्थ्याला सोडून इतर महिलेस मदतनीस म्हणून घेण्यात आले असल्याचा आरोप आहे. अधिकारी कर्मचारीच्या माध्यमातून आर्थिक व्यवहार झाला आहे असे बोलल्या जात आहे. याप्रकरणी उच्चस्तरीय चौकशी करणे गरजेचे आहे. अशी मागणी होत आहे. जिल्हाधिकारी व नवीन आलेले जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सखोल चौकशी करावी अशी मागणी अर्ज भरलेल्या महिलेकडून करण्यात येत आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करावी नसता १७ मार्च पासून अंबड पंचायत समितीसमोर अमरण उपोषण करण्याचा इशारा कर्जत (ता.अंबड ) येथील रेखा सिताराम शेलार या महिलेने तक्रार निवेदन करण्यात आले होते.

एकात्मीक बालविकास सेवा योजना प्रकल्प १ व २ ग्रामीण अंबड अंतर्गत झालेल्या अंगणवाडीच्या मदतनीस पदाच्या भरतीत मोठ्या प्रमाणात घोळ व भ्रष्टाचार झाला असल्याचा आरोप आहे. मदतनिस निवड प्रक्रियेत पारदर्शकता न ठेवल्याचा आरोप रेखा सिताराम शेलार यांनी केला. दरम्यान, शासनाच्या मार्गदर्शक तत्वाचे पालन न करण्यात येऊन शैक्षणिक अर्हता, गुणवत्ता, वय बोली,भाषा आदी निकष डावलून बालविकास प्रकल्प अधिकारी व समितीतील सदस्यांनी व्यक्तिगत फायद्यासाठी पडद्याआडून माध्यमातून लाखो रूपये घेतल्याचा आरोप आहे. या भरती संदर्भात हरकत घेतली आहे. त्या हरकतीवर समाधानकारक उत्तर न देता केवळ आर्थिक व्यवहारापोटी ऑर्डर देण्यात आली आहे. गुणवत्ता डावलून आमच्यावर अन्याय केला असल्याचा आरोप ही याठिकाणी करण्यात आला आहे. कर्जत येथील परदेशीवाडी येथे मदतनिस पदाची एक जागा रिक्त होती.

## पान १ वरून...



### कृषिमंत्री माणिकराव कोकाटेंची

सांगण्यात आले. तर प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन सत्र न्यायालयाच्या निर्णयाला अंतरिम स्थगिती देण्याची मागणी केली. न्यायालयाने सत्र न्यायालयाच्या आदेश कायम ठेवला.

--------------

### शेतमजुरांसह बटाईदारांनाही

तयार करण्यासाठी एफपीओ आणि कृषी सखी योजनेची मदत घेता येऊ शकते. त्यामुळे उर्वरित शेतकऱ्यांना फार्मर आयडी देण्यात येईल. तसेच जे शेतकरी भाडेतत्वावर शेती कसत आहेत. ते शेतकरीही फार्मर आयडीपासून वंचित राहणार नाहीत.'' अशी ग्वाही कृषिमंत्र्यांनी दिली. पुढे ते म्हणाले, ''सुरुवातीला फार्मर आयडी केवळ भूधारक शेतकऱ्यांना देण्यास सुरुवात करण्यात आली. परंतु राज्य सरकारांना निर्देश देण्यात आले आहेत की, भाडेतत्वावर शेती कसणारे, बटाईदार आणि शेतमजूरांना देखील फार्मर आयडी देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे शेतीसंबंधित सर्व योजनांचा लाभ या शेतकऱ्यांना मिळू शकेल. त्यासाठी केंद्र सरकार राज्य सरकारांना पूर्णत मदत करेल.'' असे आश्वासन कृषिमंत्र्यांनी यावेळी दिले. कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान म्हणाले, ''यापूर्वी शेतकऱ्यांपर्यंत विविध योजनांचा लाभ पोहचवण्यासाठी अडचणी येत होत्या. कारण खात्रीलायक डेटा सरकारकडे नव्हता. परंतु आता मात्र पंतप्रधानांच्या नेतृत्वाखाली डिजिटल कृषी मिशन आखण्यात आले आहे. शेतकऱ्यांना डिजिटल ओळखपत्र देण्यात येत आहे. या ओळखपत्रामुळे अर्ध्या तासात शेतकऱ्यांना कर्ज मिळेल. शेतमालाच्या विक्रीतही कोणत्याही कागदपत्राविना शेतकरी शेतमालाची विक्री करू शकतो. तसेच पीक लागवडीखालील क्षेत्राची माहिती आणि नुकसान भरपाई शेतकऱ्यांना वेळेत मिळेल. '' असेही चौहान म्हणाले.

----------

### कुटेंच्या संपत्तीचा लिलाव

रुपयाची मालमत्ता सिल केली आहे. तर ठेवीदारांच्या ११०० कोटींच्या ठेवी अडकल्या आहेत. तर कुटेंची मालमत्ता जप्त करून लिलाव करण्याची प्रक्रिया लवकरच करणार असून त्यातून मिळणाऱ्या पैशातून ठेवीदारांना ठेवी परत केल्या जातील, असे सांगितले. त्यामुळे हजारो कोटी रुपये मल्टीस्टेटमध्ये अडकलेल्या हजारो ठेवीदारांना दिलासा मिळण्याची शक्यता आहे.

--------------

### राज्यात नदी पुनरुज्जीवनासाठी

उपाययोजना केल्या जातील. पंकजा मुंडे पुढे बोलताना म्हणाल्या की, पर्यावरण नियमांचे उल्लंघन करणाऱ्या उद्योगांवर कारवाई होईल. पर्यावरण सुधारण्यासाठी नवीन तंत्रज्ञानाचा अवलंब केला जाईल. 'नमामि गंगे' योजनेच्या अंमलबजावणी केंद्र सरकारच्या या योजनेला गती देऊन राज्यातील नद्यांचे संरक्षण आणि पुनरुज्जीवन केले जाईल असेही यावेळी सांगितले.नाशिक येथे सन २०२७ मध्ये होणाऱ्या कुंभमेळ्यासाठी गोदावरी नदी स्वच्छ करण्यासाठी विभाग महत्त्वाची भूमिका बजावेल. कुंभमेळ्यासाठी येणारा भाविक गोदावरी नदीमध्ये स्नान केल्यानंतर समाधान व्यक्त करेल असे नियोजन करण्यासाठी प्रयत्न केले जाणार असल्याचेही यावेळी सांगितले.

----------

### निकाल लागला तरी महापालिका

महापालिका निवडणुका येत्या ऑक्टोबर महिन्यानंतरच लागणार असल्याची माहिती समोर आली आहे. येत्या मे महिन्यात निकाल लागला तरीदेखील महापालिका निवडणुका पावसाळ्यापूर्वी घेता येणार नाहीत. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, निकाल लागल्यानंतर जवळपास १०० दिवस प्रशासकांना निवडणुकीची तयारी करायला वेळ लागणार आहे.

**महापालिकेची निवडणूक ऑक्टोबरनंतरच**

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, येत्या ऑक्टोबर महिन्यानंतरच महापालिकेच्या निवडणुका लागणार असल्याची माहिती समोर आली आहे. येत्या ४ मे रोजी सर्वोच्च न्यायालयात महापालिका निवडणुकासंदर्भातील पुढील सुनावणी होणार आहे. या सुनावणीवेळी सर्वोच्च न्यायलयाने निकाल दिला तरी महापालिकेची निवडणूक ही ऑक्टोबरनंतरच लागू शकते, असे बोलले जात आहे.

**आढावा आणि तयारीसाठी १०० दिवस**

तसेच महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांची आणि राज्य निवडणूक आयोगाची नुकतीच बैठक पार पडली. यावेळी निवडणुकीसंदर्भात चर्चा झाली. कोर्टाने निकाल दिल्यानंतर पालिकेला जवळपास १०० दिवस आढावा आणि तयारीसाठी लागेल, अशी माहिती समोर आली आहे. यामध्ये वॉर्ड रचना, यादी तपासणी, हरकती मागवणे, आरक्षण सोडत या बाबींचा समावेश असणार आहे.

----------

### बोले तैसे चाले..एकनाथ

जगताप , स्वप्निल गलधर पार पडले आहे. श्रीक्षेत्र नारायण गडाचे महंत शिवाजी महाराज, भगवान महाराज यांच्यासह जिल्हाप्रमुख अनिल जगताप, सचिन मुळे यांच्या हस्ते संतोष देशमुख कुटुंबीयांच्या घराचे मंगळवारी भूमिपूजन पार पडले. बोले तैसे चाले..या प्रमाणे एकनाथ शिंदे यांनी शब्द पाळला असून देशमुखांचे पक्के घर येत्या तीन ते चार महिन्यात पुर्ण होणार आहे.

------------

### अपेकच्या अंदाजानुसार यंदा

असे हवामान अंदाज अभ्यासक सांगत आहेत. त्यामुळे हवामानशास्त्र विभागाच्या पहिल्या अंदाजाकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागून आहे. अपेक दक्षिण कोरियाचे हवामान केंद्र आहे. प्रत्येक महिन्यात या अपेककडून अंदाज वर्तवला जातो. त्यासाठी ११ देशातील १५ हवामान केंद्राच्या डेटा मॉडेलचा वापर करून एप्रिल ते जुलै दरम्यानचा अंदाज वर्तवला जातो. त्यामध्ये दक्षिण गुजरात, गोवा, किंनारी कर्नाटक, उत्तर कर्नाटक, तेलंगणा तर महाराष्ट्रातील मुंबई, कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात मॉन्सून पूर्व पावसाची शक्यता अपेकने वर्तवली आहे. तर उत्तर भारतातील जम्मू आणि काश्मीर, लडाख, हिमाचल प्रदेश, पंजाब आणि उत्तराखंडमधील काही भागांमध्ये पाऊस थोडा कमी होण्याची शक्यता आहे. म्हणजे महाराष्ट्रात विदर्भ वगळता बहुतांश भागात एप्रिल ते जून दरम्यान पावसाची शक्यता आहे. अर्थात अवकाळी पावसाचा हा अंदाज आहे. तसेच जुलै ते सप्टेंबर दरम्यान रायलसीमा, दक्षिण कर्नाटका, तमिळनाडू आणि केरळच्या काही भागांत पावसाची कमी शक्यता आहे. तसेच गुजरात आणि दक्षिण राजस्थानच्या काही भागांमध्ये देखील कमी पावसाची शक्यता आहे. तर उर्वरित देशात मात्र सरासरी ते सरासरीपेक्षा अधिक पावसाचा अंदाज अपेकनं दिला आहे. त्यामुळे मॉन्सूनमधील पाऊस शेतकऱ्यांना साथ देईल अशी शक्यता आहे. परंतु महिन्यावार पावसाच्या अंदाजात मात्र अपेकनं पावसाच्या तूटीचेही संकेत दिले आहेत.

------------

cmyk

# कुसळंब ते श्री क्षेत्र शिर्डी पायी दिंडी सोहळ्याचा भाविक- भक्तांनी लाभ घ्यावा

पिंपळवंडी । प्रतिनिधी

प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी श्री. साईनाथ मंदिर कुसळंब यांच्या वतीने दि.२१/०३/२०२५ ते दि.२८/०३/२०२५ दरम्यान श्री. साईनाथ मंदिर कुसळंब ते श्री क्षेत्र शिर्डी साईबाबा पायी दिंडी सोहळ्याचे आयोजन केले असून या पायी दिंडी सोहळ्यात पंचक्रोशीतील भाविक-भक्तांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन लाभ घ्यावा असे आवाहन मुकुंद भराटे महाराज, ह.भ.प.गहिनीनाथ मिसाळ महाराज,हनुमंत धनवटे पुजारी साईराम यांनी केले आहे.



या पायी दिंडीचे १२ वे वर्ष असून प्रतिवर्षाप्रमाणे दि.२१/०३/२०२५ रोजी सकाळी ठीक ७ वाजता जद्दार वस्ती मठाधिपती महाराज यांचा मानाचा पालखी झेंडा घेऊन गावकरी यांच्या वतीने श्री.खंडेश्वर मंदिरात जाऊन साईबाबा पादुका पूजन करून दिंडीचे प्रस्थान होणार आहे.पायी दिंडी पालखी मार्ग पिंपळवंडी- अंमळनेर -श्री क्षेत्र मोहटा-मढी- शनिशिंगणापूर-बालाजी मंदिर सोनई, श्रीरामपूर ते श्री क्षेत्र शिर्डी असा असून पायी दिंडी- पालखी दि.२८/०३/२०२५ शुक्रवार रोजी श्री. क्षेत्र शिर्डी येथे सायंकाळी ५ वाजता पोहचणार आहे.


# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

बुधवार, दि. १९ मार्च २०२५




# अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे राज्यस्तरीय अधिवेशन शेगाव येथे होणार

## मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख यांनी केले जाहीर

नांदेड /प्रतिनिधी

अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेच्या राज्यस्तरीय बैठकीत संत नगरी शेगाव येथे पुढील राज्यस्तरीय अधिवेशन घेण्याचा निर्णय एकमताने घेण्यात आला. या अधिवेशनाची तारीख लवकरच जाहीर करण्यात येईल, अशी घोषणा अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस. एम. देशमुख यांनी केली.

या बैठकीचे उद्घाटन एस. एम. देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले. त्यांनी मराठी पत्रकार परिषदेच्या ऐतिहासिक वाटचालीवर प्रकाश टाकत पत्रकारांच्या हक्कांसाठी लढणाऱ्या या चळवळीचे महत्त्व अधोरेखित केले. ते म्हणाले, ''मराठी पत्रकार परिषद ही केवळ एक संघटना नसून पत्रकारांच्या हक्कांसाठी लढणारी चळवळ आहे. पत्रकारांवरील अन्याय, अत्याचार, आणि त्यांच्या सामाजिक सुरक्षेसाठी परिषद सातत्याने संघर्ष करत आहे. यावेळी परिषदचे प्रदेश उपाध्यक्ष चंद्रकांत बर्दे यांनी पत्रकारांसाठी पेन्शन योजना





लागू करण्याची मागणी केली. ''पत्रकारांना आर्थिक स्थैर्य मिळावे यासाठी शासनाने ठोस निर्णय घ्यावा. पेन्शन योजनेचा लाभ मिळावा यासाठी परिषद सातत्याने प्रयत्नशील राहील,'' असे त्यांनी सांगितले.

बैठकीस मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस एम देशमुख,विश्वस्त किरण नाईक, विश्वस्त शरद पाबळे, राज्य अध्यक्ष मिलिंद आष्टीवकर, राज्य सरचिटणीस सुरेश नाईकवाडे,डिजीटल मिडीया परिषदेचे प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे,मराठी पत्रकार परिषदेचे राज्य उपाध्यक्ष चंद्रकांत बर्दे,राज्य कार्याध्यक्ष शिवराज काटकर,राज्य उपाध्यक्ष चंद्रकांत बर्दे, माजी अध्यक्ष सिद्धार्थ शर्मा, आदी मान्यवरांनी पत्रकारितेच्या सध्याच्या परिस्थितीवर आणि भविष्यातील आव्हानांवर आपले विचार मांडले.

बैठकीला कार्यकारिणीचे राज्य पदाधिकारी, उपाध्यक्ष, विभागीय सचिव, जिल्हाध्यक्ष,परिषद प्रतिनिधी ,अधिस्वीकृती समिती सदस्य,डिजिटल मीडिया,महिला आघाडी सह राज्यभरातून २७ जिल्ह्यातील पदाधिकारी उपस्थित होते. महाराष्ट्र गित विजय जोशी यांनी सादर केले.संचलन परिषदेचे प्रदेश सरचिटणीस सुरेश नाईकवाडे यांनी केले.प्रास्ताविक जिल्हाध्यक्ष संतोष पंडागळे यांनी केले. तर बैठक यशस्वी करण्यासाठी जिल्हाध्यक्ष संतोष पंडागळे, राज्य उपाध्यक्ष प्रकाश कांबळे यांच्या नियोजनाखाली कोअर कमिटी आणि इतर सर्व सदस्य यांनी मोलाचे सहकार्य केले.


### पत्रकारांसाठी संघटित संघर्ष आवश्यक बैठकीचा निष्कर्ष

बैठकीच्या शेवटी एकमुखी निष्कर्ष निघाला की, पत्रकारांच्या न्याय हक्कांसाठी मराठी पत्रकार परिषद अधिक ठोस भूमिका घेईल. शासनदरबारी पत्रकारांच्या मागण्यांसाठी सातत्याने पाठपुरावा केला जाईल.

# रामगड येथे नारळी सप्ताहाचे आयोजन

बीड । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील रामगडावर नारळी अखंड हरिनाम सप्ताह व भावार्थ रामायण कथेचे आयोजन रविवार दिनांक ३० मार्च पासून करण्यात आले असून या सप्ताहाची सांगता रविवार दिनांक ६ एप्रिल रोजी महाप्रसादाने होणार असल्याची माहिती श्रीक्षेत्र संस्थान रामगड च्या भक्तांनी दिली.







परंपरेप्रमाणे बीड जालना रोड पासून जवळच असलेल्या रामगडावर श्रीक्षेत्र संस्थान रामगड येथे नारळी अखंड हरिनाम सप्ताह व भावार्थ रामायण कथेचे आयोजन करण्यात आले आहे.याचा शुभारंभ ह .भ .प. गुरुवर्य स्वामी योगीराज महाराज यांच्या हस्ते होणार असून या काळामध्ये रात्री ९ ते ११ या वेळेत दररोज किर्तन होणार आहे. दिनांक ३० मार्च रोजी ह. भ. प. कृष्णा महाराज नवले (पैठण) यांचे कीर्तन, सोमवार दिनांक ३१ मार्च रोजी ह. भ. प. विशाल महाराज खोले (मुक्ताईनगर) यांचे कीर्तन, मंगळवार दिनांक १ एप्रिल रोजी ह. भ. प. अर्जुन महाराज लाड गुरुजी (होळ) यांचे कीर्तन, बुधवार दिनांक २ एप्रिल रोजी ह. भ. प. धर्मगुरू अमृताश्रम स्वामी महाराज (नवगण राजुरी) यांचे कीर्तन, गुरुवार दिनांक ३ एप्रिल रोजी शिवा महाराज बावस्कर (बुलढाणा) यांचे कीर्तन, शुक्रवार दिनांक ४ एप्रिल रोजी ह. भ. प. जगन्नाथ महाराज पाटील (कल्याण) यांचे कीर्तन ,शनिवार दिनांक ५ एप्रिल रोजी ह. भ. प. अनिल महाराज पाटील (बार्शी) यांचे कीर्तन होणार असून काल्याचे किर्तन रविवार दिनांक ६ एप्रिल रोजी दुपारी १२ ते २ या वेळेत रामगडाचे महंत ह. भ. प. स्वामी योगीराज महाराज यांचे कीर्तन होणार आहे. या कीर्तनाचा लाभ घ्यावा असे आवाहन श्री क्षेत्र संस्थान रामगड परिसरातील भाविकांनी केले आहे. या सप्ताहामध्ये परिसरातील सर्व गावांचा सहभाग राहणार आहे. हा सप्ताह भव्यदिव्य होणार असल्याची माहिती बांड महाराज यांनी दिली.

# खापरवाडी (रत्नापूर) या ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त भव्य क्रिकेट स्पर्धेचे आयोजन

## क्रिकेट प्रेमींनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे ,आयोजक दत्ता पटाईत यांचे आवाहन

**वडवणी । प्रतिनिधी**

वडवणी तालुक्यातील खापरवाडी रत्नापूर या ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धा चषक खापरवाडी रत्नापूर २०२५ चे आयोजन करण्यात आले आहे, दिनांक २० ,३.२०२५ वार गुरुवार रोजी सकाळी नऊ वाजता रत्नापूर या ठिकाणी या क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन होणार आहे ,तरी या क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटक जयसिंग भैय्या सोळंके माजी सभापती जिल्हा परिषद बीड यांच्या हस्ते होणार आहे, या कार्यक्रमाला पंचक्रोशातील क्रिकेट प्रेमी उपस्थित राहावे, व या क्रिकेट संघातर्फे प्रथम बक्षीस खापरवाडी चे विद्यमान सरपंच सचिन लंगडे व उपसरपंच ऋषिकेश पटाईत यांच्यावतीने ३१ हजाराचे बक्षीस देण्यात येणार आहे, दुसरे बक्षीस औदुंबर सावंत माजी जिल्हा परिषद सदस्य व आनंद काळे यांच्यावतीने १५ हजाराचे बक्षीस देण्यात येणार आहे, व तिसरे बक्षीस डॉ,गणेश सुरवसे, यांच्यावतीने ७५०० च बक्षीस देण्यात येणार आहे, यामध्ये विशेष सहकार्य बजरंग बप्पा साबळे तालुका अध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस वडवणी, संभाजी तात्या शिंदे सभापती कृषी उत्पन्न बाजार समिती वडवणी,



विश्वास आगे माजी सरपंच देवडी, ज्ञानेश्वर सुरवसे माजी सरपंच देवगाव, गोविंद बादाडे उपसरपंच काडीवडगाव, ईश्वर पटाईत माजी ग्रामपंचायत सदस्य खापरवाडी, नितीन लंगडे, बब्रुवान इतापे सचिव सेवा सहकारी सोसायटी, नितीन गोजे इंडियन आर्मी, रामहरी पटाईत गणेश पॅथॉलॉजी हे पाणी सेवा देणार आहेत, मॅन ऑफ द मॅच, साई राम बॅटरी वडवणी, बेस्ट बॅट्समन मुकुंद लंगडे हर्षद टायर्स माजलगाव, बेस्ट कीपर संग्राम चोरगे संग्राम मल्टी सर्विसेस खापरवाडी, मॅन ऑफ द सिरीज तानाजी आजबे इंजिनियर पंचायत समिती वडवणी, आयुष ट्रेडर्स चे मालक वैभव लंगडे ,बेस्ट बॉलर दादासाहेब गव्हाणे इंडियन आर्मी, यांच्या सर्वांच्या सहकार्याने व आयोजक क्रिकेट प्रेमी कमिटी यांच्यावतीने खापरवाडी रत्नापूर या ठिकाणी भव्य क्रिकेट स्पर्धा मोठ्या प्रमाणात उत्साहात पार पडणार आहे या कार्यक्रमाला या क्रिकेट प्रेमींच्या खेळाला वाव देण्यासाठी परिसरातील क्रिकेट प्रेमींनी मोठ्या संख्येने सहभागी व क्रिकेट स्पर्धा पाहण्यासाठी मोठ्या संख्येने युवक बांधवांनी मोठ्या प्रमाणात उपस्थित राहण्यात यावे असे आव्हान आयोजक दत्ता पटाईत यांच्या वतीने करण्यात आले आहे,

# गंगाधर काळे यांचे निधन

माजलगाव । प्रतिनिधी

शहरातील गजानन मंदिर भागातील रहिवाशी असलेले गंगाधर गोपाळबुवा काळे वय ९० वर्षे यांचे वृध्दापकाळाने दि १८ मंगळवार रोजी निधन झाले.त्यांच्या पार्थीवावर मंगलनाथ स्मशानभुमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. नगरपालिकेचे कर्मचारी अनंत काळे व वेदशास्त्र संपन्न विनायक काळे यांचे ते वडील होत.



पान ६ वरून...

## स्थानिक स्वराज्य संस्थेच्या

या बैठकीत अशोक पटवर्धन स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीच्या अनुषंगाने चर्चा केली. याबरोबरच बीड जिल्हा शिवसेनेची पुढील वाटचाल दिशा ध्येय धोरण सविस्तरपणे समजून सांगितले. यानंतर शिवसेना ओबीसी व्ही जे एनटी महाराष्ट्र संपर्कप्रमुख किरण चव्हाण, युवसेना जिल्हाप्रमुख सुजित शिंदे आणि ऋषि जगताप यांचे वाढदिवसानिमित्त शुभेच्छा सत्कार करून बीड जिल्हा शिवसेनेच्या अभिष्टचिंतन करण्यात आले. याप्रसंगी शिवसेना महिला आघाडी युवसेना शेतकरीसेना आजी माजी सरपंच पदाधिकारी लोकप्रतिनिधी तथा शिवसैनिकांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.

**एकनाथजी शिंदे साहेब यांचे हात बळकट करण्यासाठी पूर्ण ताकदीने कामाला लागा- जगताप, मुळूक गलधर**

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा शिवसेना मुख्य नेते एकनाथजी शिंदे साहेब सर्वसामान्यांच्या मनातील आवडत नेतृत्व आहेत. कार्यकर्त्यांना जपणे त्यांना आधार देणे ही शिंदे साहेबांची सवय बनलेली आहेम्हणूनच शिंदे साहेबांच्या नेतृत्वात अवघ्या महाराष्ट्रभरात शिवसेनेची ताकद वाढत चालली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका तोंडावर येऊन ठेपल्या आहेत. आपल्या आगामी निवडणुकात संपूर्ण बीड जिल्ह्यात शिवसेनेचा भगवा फडकवायचा असून आपले नेते एकनाथजी शिंदे साहेब यांचे हात देखील आपल्याला बळकट करण्यासाठी पूर्ण ताकदीने कामाला लागायाचे आहे असे शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, सचिन भैय्या मुळूक, स्वप्नील भैय्या गलधर यांनी आढावा बैठकीत अवाहन केले.

## सिरसाळा भूषण पुरस्कारची

राजकीय क्षेत्र श्री मल्हारराव नाचण डोणगांवकर- (साहित्य क्षेत्र), श्री शाम लक्ष्मण सरवदे - (सामाजिक क्षेत्र ), श्री.अशोक हनुमंत गलांडे -(पत्रकारिता क्षेत्र), श्री राहुल रामदास बुरंगे- (कृषी क्षेत्र), डॉ. तुकाराम हरीचंद्र देवकर- (सांस्कृतिक), डॉ. उषा यशवंतराव माने- (महिला सामाजिक ), श्री. सुरवसे प्रकाश केरबा- शैक्षणिक क्षेत्र आदि पुरस्कार प्राप्त व्यक्तींची निवड केली असून या पुरस्काराचे वितरण २२ मार्च २०२५ रोजी सायंकाळी ६ वाजता परळी तालुक्यातील सिरसाळा येथील यशराज पब्लिक स्कुल या ठिकाणी होणार आहे.

''सिरसाळा भूषण पुरस्कार २०२५'' या सन्मान सोहळा कार्यक्रमाचे अध्यक्ष. मा. खा. बजरंगबाप्पा सोनवणे (खासदार, बीड लोकसभा मतदार संघ) हे असणार असून कार्यक्रमाचे उदघाटक मा. दिनेशजी चव्हाण साहेब उपसचिव ( इतर मागास बहुजन कल्याण मंत्रायल, मुंबई ) हे राहणार आहेत.या सन्मान सोहळ्याचे विशेष आकर्षण. निशिगंधा वाड (सिने अभिनेत्री मुंबई) व ज्यू. मकरंद अनासपुरे हे असणार असून या प्रसंगी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन श्री. जनक साहेबराव उबाळे अध्यक्ष जनकल्याण बुउद्देशिय सेवाभावी संस्था वाघाळा व अध्यक्ष सिरसाळा भूषण पुरस्कार २०२५ निवड समिती यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## शिक्षण आणि शिक्षक हाच

स्वामी विवेकानंद विद्यालयाचे मुख्याध्यापक लक्ष्मण जगताप सह गणेश लाटे, गणेश गटकळ ,जीवन नखाते, नारायणराव जाधव व ज्योत्स्ना बादाडे हे होते. राजमाता जिजाऊ, छत्रपती शिवाजी महाराज, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमा पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. संस्थेचे अध्यक्ष गणेश घायतिडक त्यांनी प्रास्ताविकात शाळेचा विकासाचा अहवाल मांडला. याप्रसंगी मनोगतात गणेश गटकळ यांनी जिजाऊ ज्ञान मंदिर ची या ग्रामीण भागातील शाळेची तुलना जिल्ह्यातील एका नामांकित संस्थेसोबत होत आहे याचे समाधान असल्याचे व्यक्त केले. माफक दरात दर्जेदार शिक्षण देणारी या परिसरातील ही एकमेव शाळा असून सर्वसामान्य घरातील विद्यार्थ्यांना यामुळे ज्ञानार्जन करणे सुलभ झाल्याचे मत स्वामी विवेकानंद विद्यालयाचे मुख्याध्यापक लक्ष्मण जगताप यांनी व्यक्त केले. सावित्रीबाई फुले यांच्या जीवन क्रांती वरील गीताने या कार्यक्रमाची सुरुवात झाली या कार्यक्रमाच्या माध्यमातून शिक्षक विद्यार्थी नाटीका,अघोरी साधू, रक्त चरित्र भूत या नृत्यांसह इतर सर्व गितांनी प्रेक्षक तल्लीन झाले. जन्म बाईचा व वृद्धाश्रमावर आधारित बागबान या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या विलोभनीय सादरीकरणाने उपस्थित प्रेक्षक भावूक झाले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारीत्यांनी श्रम घेतले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिजाऊ ज्ञान मंदिर चे अध्यक्ष गणेश घायतिडक यांनी केले.

# छत्रपतींचा जाज्वल्य इतिहास अभ्यासक्रमात समाविष्ट करा -प्रा. पाटील

**बीड । प्रतिनिधी**

राष्ट्रीय शिक्षण धोरण -२०२० या शैक्षणिक अभ्यासक्रमात छत्रपतींचा शिवाजी महाराजांचा जाज्वल्य इतिहास शालेय अभ्यासक्रमात समाविष्ट करा या मागणीसाठी शिक्षक नेते प्रा. सत्येंद्र पाटील यांनी छत्रपती शिवरायांच्या जयंती दिनापासून एक व्यापक चळवळ सुरू केली. या चळवळीला बीड जिल्ह्यातील मुख्याध्यापकांनी एकमुखी पाठिंबा दिला. शिवाय जोपर्यंत आपली मागणी मान्य होऊन नव्या शैक्षणिक अभ्यासक्रमात छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास समाविष्ट होत नाही. तोपर्यंत स्वस्थ बसणार नाहीत असा निर्धार मुख्याध्यापकांनी व्यक्त केला.



महाराष्ट्रात सुराज्य निर्माण करावयाचे असेल नव्या पिढीला छत्रपती शिवाजी महाराजांचा जाज्वल्य इतिहास माहीत असला पाहिजे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवन कार्यातून प्रेरणा घेऊन आमची नवी पिढी चारित्र्य संपन्न, बलवान आणि सामर्थ्यशाली बनली पाहिजे. त्यामुळे नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार आखलेल्या अभ्यासक्रमामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवन चरित्राचा समावेश करणे आवश्यक आहे. त्या मधून येणाऱ्या पिढीला छत्रपती शिवाजी महाराजांचे जीवन चरित्र आणि कार्याची माहिती मिळेल. त्यातून धैर्यवान कृतिशील आणि चारित्र्यसंपन्न अशी पिढी निर्माण होणार आहे. या सर्व गोष्टीचा विचार करून बीड शहर सार्वजनिक शिवजन्मोत्सव

समितीचे अध्यक्ष प्रा. सत्येंद्र पाटील सरांनी शिवजन्मोत्सवाच्या पवित्र व्यासपीठावरून हा विचार मांडला. प्रा. पाटील सरांच्या या विचाराला आज चळवळीचे स्वरूप प्राप्त झाले. प्रा. पाटील सरांनी उभ्या केलेल्या या चळवळीस बीड जिल्ह्यातील मुख्याध्यापकांनी मंगळवार दिनांक १८ रोजी बीड शहरातील सौ. के. एस. के. महाविद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत पाठिंबा देऊन छत्रपतींचा जाज्वल्य इतिहास शालेय अभ्यासक्रमात समाविष्ट करण्याची एकमुखी मागणी केली. शिवाय मागणी मान्य होईपर्यंत आणि स्वस्थ बसणार नाही असा निर्धार उपस्थित मुख्याध्यापकांनी यावेळी व्यक्त केला. या प्रसंगी बीड जिल्ह्यातील मुख्याध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरम्यान या चळवळीची महाराष्ट्र राज्याचे शालेय शिक्षण मंत्री ना. दादा भुसे यांनी दखल घेऊन चर्चा करण्यासाठी पुढच्या आठवड्यात शिष्टमंडळाला बोलावले आहे.

# ज्येष्ठ समाजसेवक डॉ संजय तांदळे यांचा पोलीस प्रशासनाच्या वतीने सत्कार

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील सामाजिक कार्यकर्ते डॉ. संजय तांदळे यांच्या सामाजिक कार्याची दखल घेत पोलीस प्रशासनाच्या वतीने मंगळवार दिनांक १८ रोजी वाहतूक शाखेच्या पोलीस स्टेशनमध्ये यथोचित सत्कार करण्यात आला.

बीड शहरातील मित्र नगर भागातील रहिवासी असलेले सामाजिक कार्यकर्ते डॉ. संजय तांदळे हे मागील काही वर्षांपासून सामाजिक कार्य करत आहेत. बीड आणि परिसरात काही अपघात झाल्याची माहिती मिळताच ते संबंधित पोलीस स्टेशनला कळवितात नुसतं कळवून थांबत नाहीत तर पोलिसांच्या व मित्रांच्या मदतीने लागली तातडीने घटनास्थळी भेट देऊन संबंधितांना मदत करण्याचं काम करतात त्यांच्या या कार्यामुळे शेकडो अपघातग्रस्तांना तातडीची मदत मिळाली आहे. तर अनेक जणांचे प्राण वाचले आहेत. तसेच इतर

बीड शहरातील गोरगरीब आणि निराधार लोकांना स्वखर्चातून मदत उपलब्ध करून देतात. शहरातील मनोरुग्ण व्यक्तींचं पोलिसांच्या



सहकार्याने पुनर्वसन करून त्यांना चांगले जीवन जगण्यासाठी मोठा आधार दिला आहे. त्याचबरोबर बीड शहरातील विविध सामाजिक उपक्रमात त्यांचा हिरीरीने सहभाग असतो.सामाजिक कार्याबरोबरच ते निरोगी व निरामय जीवन कसे राहावे यासाठी जनतेला तसेच पोलिसांना योगाचे प्रशिक्षण देण्याचे काम करत आहेत. त्यांच्या या सामाजिक उपक्रमाची दखल घेऊन पोलीस प्रशासनातील जिल्हा वाहतूक शाखेचे प्रभारी सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. सुभाष सानप, पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक शेख उस्मान यांनी दखल घेऊन मंगळवार दिनांक १८ रोजी सुभाष रोड येथील वाहतूक शाखेच्या पोलीस स्टेशनमध्ये शाल श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन यथोचित सत्कार करून त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. या वेळी पोलीस हवालदार श्रीकांत पाखरे, शिवदास घोलप, चालक संतोष हारके, जलदूत बाजीराव ढाकणे आदी उपस्थित होते.

पोलीस प्रशासनाकडून झालेला सत्कार पुढील कार्यास प्रेरणा देणारा - डॉ. संजय तांदळे

पोलीस प्रशासनाकडून आज माझ्या कामाची दखल घेऊन माझा यथोचित सन्मान केला. हा सन्मान म्हणजे खऱ्याखुऱ्या कामाची आणि प्रामाणिक कार्याची मला पावती मिळाली असल्याची भावना यावेळी डॉ संजय तांदळे यांनी व्यक्त केली.

# केव्हीके अंबाजोगाई येथे भव्य शेतकरी मेळावा

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

दीनदयाल शोध संस्थान कृषि विज्ञान केंद्र अंबाजोगाई येथे शेतकरी मेळावा संपन्न झाला. यावेळी मंचावर मेळाव्याचे अध्यक्ष म्हणून दीनदयाल शोध संस्थान बीड प्रकल्प संचालक डॉ. उपेंद्र कुलकर्णी, तर उद्घाटक म्हणून बीड जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांची उपस्थिती होती. सामाजिक कार्यकर्ते अंबाजोगाई नंदकिशोर मुंदडा, केंद्रीय कापूस संशोधन संस्था नागपूरचे वरिष्ठ मृदा शास्त्रज्ञ डॉ. अंगामूथु मनिकंदन, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी बीड सुभाष साळवे, उद्योगवर्धिनी सोलापूरच्या चंद्रिका चव्हाण, कापूस तज्ञ दादा लाड, कृषी महाविद्यालय अंबाजोगाई सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्य डॉ. संजीव बंटेवाड तसेच कृषी विज्ञान केंद्राचे वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख डॉ. वसंत देशमुख यांची उपस्थिती होती.

मेळाव्याचे प्रास्ताविक करताना डॉ. देशमुख यांनी सांगितले की, बीड जिल्ह्यात कमी पर्जन्यासोबतच जमीन हलकी आहे. त्यामुळे कापसाची उत्पादकता कमी आहे. सुधारित घन व अतिघन लागवड तंत्राचा वापर करून कापसाचे उत्पादन वाढविणे शक्य आहे. सुधारित तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचण्यासाठी मेळाव्याचे आयोजन केले आहे. तसेच महिला शेतकऱ्यांमधील विविध कौशल्यांना चालना देण्यासाठी मेळाव्याच्या माध्यमातून प्रयत्न केला जात आहे. कृषी विज्ञान केंद्रावरील विविध उत्पादने, सेवा-सुविधा यांची माहिती शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी मेळावा आयोजित केला असल्याचे त्यांनी सांगितले.

उपस्थित मान्यवरांच्या शुभहस्ते जिल्ह्यातील उच्चांकी कापूस उत्पादकता मिळवलेल्या १३ महिला व पुरुष शेतकऱ्यांचा 'राष्ट्रऋषी नानाजी देशमुख शेतकरी पुरस्कार' देऊन सन्मान करण्यात आला. मेळाव्या दरम्यान आयोजित केलेल्या कृषी प्रदर्शनामध्ये विविध बीजोत्पादन करणाऱ्या कंपन्यांचे प्रदर्शनी दालने लावण्यात आले होते. तसेच कृषी यांत्रिकीकरणाच्या अनुषंगाने ड्रोन, ट्रॅक्टर यासारख्या विविध अवजारांचे प्रदर्शनी दालन व प्रात्यक्षिक संपन्न झाले.

जिल्हाधिकारी पाठक यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, शेतकऱ्यांना





दिलेला पुरस्कार जिल्ह्यातील इतर शेतकऱ्यांना प्रेरणादायी ठरतो. शेती आपली संस्कृती आहे. महिला शेतामध्ये पूर्ण समर्पणाने कार्य करतात. आपला देश यापूर्वी आयातदार होता; आज सर्वात मोठा निर्यातदार देश म्हणून जगाला पोसतो आहे. शेतकरी आणि शास्त्रज्ञांच्या परिश्रमातून कृषी क्षेत्रात आपल्या देशाने मोठी प्रगती साध्य केली आहे. पुरस्कार प्राप्त शेतकऱ्यांनी तंत्रज्ञान प्रसारात पुढाकार घ्यावा. त्यांची जबाबदारी वाढली आहे. शेतकरी हाच जगाचा पोशिंदा असल्याचे त्यांनी सांगितले.

डॉ. मनीकंदन यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, सघन कापूस लागवड तंत्रज्ञान अत्यंत सोपे आहे. हंगामाच्या सुरुवातीपासून नियोजन करून कापूस उत्पादनात मोठी वाढ मिळविता येते. बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी विक्रमी उत्पादन घेतले आहे. कापूस पिकात एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन करणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

चंद्रिका चव्हाण यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, महिलांनी सर्वप्रथम स्वतःची आर्थिक पत तयार केली पाहिजे. सृजनशक्ती केवळ महिलांमध्ये आहे. महिला कोणताही उद्योग नेटाने पुढे नेतात. कोणत्याही अडचणीवर मात करण्याची हिम्मत महिलांमध्ये असते. महिलांनी एकत्र येऊन कौशल्याच्या आधारावर यश मिळवणे शक्य आहे. काम, दाम आणि सन्मान महिलांना मिळाला पाहिजे. विविध तंत्रज्ञानाची माहिती मिळवण्यासाठी महिलांनी कृषि विज्ञान केंद्राची मदत घ्यावी महिलांमधील आत्मविश्वास वाढवून त्यांना उद्योगासाठी प्रोत्साहन देऊ शकतो असे त्यांनी सांगितले.साळवे यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, बीड जिल्ह्यात महिलांना प्रक्रिया उद्योगासाठी सूक्ष्मअन्न प्रक्रिया योजनेअंतर्गत ३५ टक्के एवढे अनुदान कृषी विभागाच्या माध्यमातून देण्यात येते आहे. आत्म्या बीड महिलांना विविध प्रक्रिया उद्योग कौशल्याचे प्रशिक्षण देण्यासाठी पुढाकार घेत आहे. सेंद्रिय शेती योजना माध्यमातून कृषी विभाग महिलांना प्राधान्य देत आहे. उन्हाळ्याच्या काळामध्ये जमिनीचे माती परीक्षण करून घ्यावे. त्यामुळे पुढील हंगामात अनावश्यक उत्पादन खर्च कमी करता येतो. शेतकऱ्यांनी सेंद्रिय व रासायनिक पद्धतीतून संतुलित शेतीचा अवलंब करावा.कापूस तज्ञ लाड यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, कापूस शेतकऱ्यांना वरदान ठरणारे पीक आहे. सगन लागवड पद्धतीसह गळफांदी छाटणी तंत्रज्ञान वापराने आवश्यक आहे. सघन लागवडीमध्ये प्रति झाड मर्यादित बोंड संख्या ठेवून बोंडाचे वजन वाढविले जाते, तसेच एकूण झाडांची संख्या वाढल्यामुळे एकरी उत्पादकता वाढलेली आहे. गळफांदी कापूस उत्पादनातील मोठा अडसर ठरत आहे. गळफांदी छाटून कापूस उत्पादनात वाढ प्राप्त झाली आहे. गळफांदी छाटणी तंत्रज्ञानाला भारतीय कृषी अनुसंधान परिस्थितीची मान्यता मिळाली आहे तसेच या तंत्रज्ञानासाठी पेटंट मिळाले असल्याची माहिती त्यांनी दिली.

अध्यक्षीय समारोप करताना कुलकर्णी यांनी सांगितले की, दादा लाड यांनी कापूस उत्पादनातील विविध विषय मांडले. शेतकऱ्यांनी प्रयत्नपूर्वक उत्पादनाची पातळी वाढवण्यासाठी प्रयत्न करावा. सर्व मार्गदर्शकांनी विविध विषयांवर सखोल मार्गदर्शन केले. या मार्गदर्शनाचे फायदे पुढील काळात दिसून येतील. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कृषीविद्या शास्त्रज्ञ कृष्णा कर्डिले यांनी केले तर आभार प्रमोद रेणापूरकर यांनी व्यक्त केले.

cmyk

# हवामान बदलावर दिल्लीत तीन दिवसीय परिषद

## कृषी क्षेत्रातील आव्हानांवर होणार चर्चा

नवी दिल्ली : केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालय आणि हार्वर्ड विश्वविद्यालय, यूएसएच्या दोन संस्थांच्या सहयोगाने भारत २०४७: हवामन-अनुकूल भविष्य निर्माण या विषयावर एक परिषद आयोजित केली आहे. ही परिषद १९ ते २२ मार्च २०२५ दरम्यान नवी दिल्लीच्या भारत मंडपममध्ये आयोजित करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमाचे आयोजन हार्वर्ड विश्वविद्यालयाच्या लक्ष्मी मित्तल आणि कुटुंब दक्षिण आशिया इन्स्टिट्यूट आणि सलाटा इन्स्टिट्यूट फॉर क्लायमेट अँड सस्टेनेबिलिटी यांनी केलं आहे, अशी माहिती केंद्रीय मंत्रालयाने दिली आहे. या परिषदेमध्ये देशातील हवामान बदलाच्या अनुषंगाने धोरण, कार्यक्रम आणि क्षेत्रीय स्तरावर उपाययोजनांसंबंधी चर्चा करण्यात येणार आहे. तसेच कृषी आणि हवामान विज्ञानाचा परस्परसंबंध, पाणी व्यवस्थापन, हवामान बदलाचा शेतीवर होणारा प्रभाव यावरही




या परिषदेत चर्चा करण्यात येणार असल्याची माहिती मंत्रालयाने दिली आहे. नीती आयोगाच्या उपाध्यक्ष सुमन बेरी, केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल राज्यमंत्री कीर्ती वर्धन सिंह यांच्या उपस्थितीत परिषदेतचं उद्घाटन करण्यात येणार आहे. तसेच शास्त्रज्ञ, शैक्षणिक संस्थांचा तज्ञांचा गट परिषदेतील चर्चेसाठी उपस्थित राहणार आहे. ह्या सत्रांमध्ये हार्वर्ड विश्वविद्यालयाचे प्रोफेसर, आणि तज्ञ देखील सहभागी होणार आहेत. दरम्यान, या चार दिवसीय परिषदेमध्ये तांत्रिक सत्र आयोजित करण्यात आली आहेत. यामध्ये हवामान विज्ञान आणि त्याचा पाणी व कृषीवर होणारा प्रभाव, आरोग्य, काम, आणि बांधकाम वातावरण यांचा समावेश आहे. उष्णतेचे परिणाम, पावसामधील बदल, आणि पाणी व्यवस्थापनाच्या आव्हानांवर चर्चा करण्यात येणार आहे. शेतकऱ्यांना कसे प्रभावी उपाय सुचवता येतील, यावरही या परिषदेत चर्चा केली जाणार आहे.

## जमिनीतील नत्र कमी होण्याची कारणे

नत्र हा पिकांच्या वाढीसाठी आणि विकासासाठी एक आवश्यक घटक आहे. पिकांच्या चयापचयामध्ये नत्र महत्वाचे असून नत्र पिकाचे अन्नद्रव्य म्हणून कार्य करते. हवेतील नत्र झाडांद्वारे कमी प्रमाणात घेतलं जातं तसेच, मातीतील कमी नत्राची उपलब्धता, ही बहुतेक वेळा पिकांची वाढ आणि उत्पन्न कमी होण्यास कारणीभूत ठरते.

नत्राचा योग्य पुरवठा केल्यास पिकाला चांगली फुले व फळे लागतात. पिकाचा नत्र ग्रहणाचा दर, एकूण दिलेल्या नत्र दराच्या ५० टक्क्यांपेक्षा कमी राहतो आणि निम्म्याहून अधिक नत्र- हवा आणि पाण्यातून वातावरणात निघून जातो. अशा परिस्थितीत शेतकऱ्याने खर्च करून टाकलेले नत्र पिकांसाठी योग्य प्रकारे वापरले जावे यासाठी नत्राचे व्यवस्थापन महत्त्वाचे ठरते. मात्र विविध मार्गाने नत्राचा ऱ्हास होत असतो. पिकाला दिलेले नत्र किती प्रमाणात मिळते हे वापरण्याच्या पद्धतीवर अवलंबून असते. ओल्या जमिनीत युरिया दिल्यानंतर त्याची पाण्यासोबत अभिक्रिया होऊन अमोनियम तयार होतो. युरिया जर पारंपरिक पद्धतीने शेतात फेकून दिला, तर ही अभिक्रिया मातीवर म्हणजेच उघड्यावर होते. अमोनियमचे अमोनिया गॅसमध्ये रुपांतर होऊन तो लगेच हवेत उडून जातो. म्हणून युरिया नेहमी जमिनीत पेरून द्यावा

मातीतील नत्र निघून जाण्याची कारणे : मातीची धूप - वारा किंवा पाण्याने शेतातून वाहून जाणाऱ्या मातीच्या कणात जोडून असलेला नत्र मातीच्या पृष्ठभागावरून नष्ट होतो. सर्व प्रदेशांमध्ये वारा आणि पाण्याची धूप सामान्य आहे. वाऱ्याची धूप कोरड्या प्रदेशात आणि पाण्याची धूप दमट प्रदेशात अधिक तीव्र असते. वाहून जाणे - जेव्हा नत्र खत पृष्ठभागावर जाते आणि नत्र जमिनीत जाण्यापूर्वी आणि पिकांद्वारे शोषण्यापूर्वी मुसळधार पाऊस पडतो, तेव्हा विरघळलेले नत्र नायट्रेटच्या स्वरूपात पृष्ठभागावरून वाहून जाण्याची शक्यता असते. अमोनिया बाष्पीकरण - जर शेणखत किंवा युरिया पृष्ठभागावर टाकला आणि लगेच जमिनीत मिसळला नाही तर अमोनिया स्वरूपात मोठ्या प्रमाणात नत्र वातावरणात नष्ट होऊ शकते. उबदार हवामानामुळे खत आणि इतर अजैविक नत्र खतांचे अमोनिया स्वरूपात वायूमध्ये रूपांतर होऊ शकते. लीचिंग - मातीच्या स्तरातून विरघळणारे नायट्रेट सहज हलविण्यासाठी पुरेसा पाऊस किंवा सिंचन किंवा दोन्ही असल्यास लीचिंग होते. नायट्रेट शेवटी भूगर्भातील जलचरांमध्ये किंवा भूजलाच्या प्रवाहाद्वारे पृष्ठभागाच्या पाण्यात स्थिरावते.



## तुषार संचाची काळजी घ्या अन्यथा उत्पादनात होईल मोठी घट

शेतकऱ्यांसाठी आधुनिक यांत्रिक उपकरणांची भूमिका महत्त्वाची आहे, आणि तुषार संच त्यापैकी एक आहे. तुषार संच हे शेतीच्या तापमानाला नियंत्रित करण्याचे, आणि शेतातील काढणीसाठी आवश्यक असलेल्या स्थितीत पाणी पुरवठा करण्याचे महत्त्वपूर्ण उपकरण आहे. त्यामुळे, तुषार संचाची योग्य देखभाल केल्यास त्याचे कार्य अधिक चांगले होते.

तुषार संचाची देखभाल कशी करावी? : १. तेल, ग्रीस आणि वंगणाचा वापर टाळा - तुषार तोट्यांमध्ये कोणत्याही प्रकारचे तेल, ग्रीस किंवा वंगण लावू नये. हे यंत्राची कार्यक्षमता आणि सुसंगती कमी करू शकते. या घटकांचा अत्यधिक वापर केल्यास यांत्रिक भागांना हानी पोहोचू शकते. म्हणून याचा वापर फक्त जेथे नितांत आवश्यक असेल तिथेच करावा.

२. वायसर झिजल्यास बदल करा - तुषार तोट्यांमधील वायसर हे महत्त्वाचे घटक असतात. जर ते झिजले असतील, तर त्याचा बदल करणे अत्यंत आवश्यक आहे. वायसरची झिजलेली स्थिती पाणी गळतीला कारणीभूत होऊ शकते, त्यामुळे त्यांना योग्य वेळी बदलणे महत्त्वाचे आहे.

३. स्प्रिंगचा ताण समायोजित करा - तुषार तोटीच्या वायसर स्प्रिंगचा ताण कमी झाल्यामुळे तुषार तोटीचा फिरण्याचा वेग कमी होतो. यामुळे यंत्राची कार्यक्षमता प्रभावित होऊ शकते. स्प्रिंगचा ताण थोडा वाढवावा किंवा आवश्यक असल्यास स्प्रिंग बदलावी. यामुळे यंत्र अधिक कार्यक्षम होईल.

४. फिटींग्जचे बोल्ट आणि नट घट्ट करा - तुषार पाईपलाइनमधील सर्व फिटींग्जचे बोल्ट व नट घट्ट करा. जर हे घटक सैल झाले तर पाणी गळती होऊ शकते. त्यामुळे यांची योग्य तपासणी करून त्यांना घट्ट करा.

५. रबर रींग्स स्वच्छ करा आणि बदल करा - तुषार पाईप, टी, बेंड, आर.क्यु.आर.सी. यामधील रबर रींग्स स्वच्छ करा आणि ते घर्षणामुळे झिजले असल्यास बदलून



टाका. रबर रींग्स ही पाणी गळतीची प्रमुख कारणे असतात. जर ते झिजले असतील तर त्यांना त्वरित बदलणे महत्त्वाचे आहे.

६. आर.क्यू.आर.सी. मधील रबरी रींग - आर.क्यू.आर.सी. मध्ये रबरी रींग झिजल्यास, आणि राईझर पाईप लावलेला नसेल तर पाणी बाहेर येऊ शकते. यामुळे पाणी गळण्याचा धोका वाढतो. त्यासाठी त्यांना बदलून टाकावे. यामुळे तुषार संच अधिक कार्यक्षम राहील.

७. पाईप आणि हूक यामधील अंतर योग्य ठरवा - तुषार पाईप आणि त्याच पाईपाच्या शेवटच्या टोकाच्या हूक यामधील अंतर २.५ ते ३ इंच असावे. हे अंतर कमी असल्यास पाईप सटकण्याचा धोका असतो. यासाठी हे अंतर योग्य ठरवणे आवश्यक आहे.

८. साठवणूक योग्य ठिकाणी करा - तुषार संचाच्या विविध भागांची साठवणूक करताना, सर्व रबर रींग्स कपलमधून काढून थंड आणि अंधाऱ्या ठिकाणी ठेवाव्यात. तसेच, तुषार तोट्या कोरड्या जागेत उभ्या ठेवल्या पाहिजेत, जेणेकरून ते लवकर खराब होणार नाहीत.

निष्कर्ष : तुषार संचाची योग्य देखभाल करणे हे शेतकऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. याच्या मदतीने शेतात तापमान नियंत्रित करणे, आणि काढणीसाठी योग्य परिस्थिती निर्मिती करणे शक्य होते.

## कोंबड्या कमी अंडी देण्यामागची कारणे

मुक्त कोंबडीपालन पद्धती मध्ये अंड्याचे किमान ४०% आणि कमाल ६५% उत्पादन मिळणे अपेक्षित आहे. म्हणजे १०० कोंबड्यामागे कमीत कमी ४० अंडी मिळायला हवीत तरच व्यावसायिक स्वरूपात हा धंदा परवडतो. परंतु काही कारणांमुळे बऱ्याचदा अंडी उत्पादन अपेक्षेप्रमाणे मिळत नाही. कमी प्रमाणात अंडी उत्पादन यामागील करणे आणि त्यावर करायचे उपाय जाणून घेऊ या.

कोंबड्यांत कमी अंडी उत्पादनांचे कारणे व उपाय :

कोंबड्या या त्या त्या वयाच्या कळपामध्ये राहणे पसंत करतात. मोठ्या कोंबड्या लहान पिलाना पिल्लांना चोच मारुन जखमी करतात किंवा पाठीवरील पिसे उपसतात. संघर्षामुळे कोंबड्यांच्या शरीरावर ताण येतो त्यामुळे अंडी उत्पादन कमी होते. म्हणून शक्यतो एकाच वयाच्या कोंबड्यांचा किंवा पिल्लांचा कळप असावा. वेगवेगळ्या वयाच्या कोंबड्यांना एकत्र मिसळू नये.

पोल्ट्रीफार्म जवळ कुत्र्यांचे भुंकणे, मांजराचे ओरडणे, हिंस्र प्राण्यांचा वावर, वाहनांचा आवाज, गोठ्यात अनोळखी व्यक्तीचा प्रवेश यामुळे कोंबड्यांवर ताण येवून अंडी उत्पादनावर परिणाम होतो यासाठी पोल्ट्रीफार्म मुख्य रस्त्या पासून सुरक्षित दूर अंतरावर असावे, जेणेकरून आवाजाचा कमी त्रास होईल. विशेषतः अंड्यांवरील कोंबड्यांना त्रास होऊ नये याची विशेष काळजी घ्यावी. उन्हाळ्यात तापमान वाढीमुळे अंडी उत्पादन घटते. अशावेळी कोंबड्याना थंड पाण्याचा पुरवठा करावा, तसेच ताण कमी करण्याची औषधे द्यावीत, शेड मधे हवा खेळती ठेवावी. राहण्यासाठी अपुरी जागा असेल तर आजार लवकर पसरतात. प्रति पक्षी किमान ४



ते ५ वर्ग फुट जागा असावी. मुक्त पद्धत असेल तर रात्रीच्या निवाऱ्यासाठी किमान २ वर्ग फुट जागा प्रति पक्षी उपलब्ध करून द्यावी. लसिकरण करताना कोंबड्यांच्या शरीरावर ताण येतो आणि अंडी उत्पादन कमी होते. लस दिल्यानंतर नेहमी कोंबड्याना ताण कमी करणारी औषधे आणि लिवर टॉनिक्स द्यावीत.

आजार पसरल्यास अंडी उत्पादनावर वाईट परिणाम होतो. त्यामुळे वरचेवर कोंबड्याना जंत नाशक औषध द्यावीत, लीटर हे नेहमी स्वच्छ आणि कोरडे ठेवावे. त्यात १०% चुना मिक्स करावा. कोंबडी ही नेहमी अंधाऱ्या आणि एकांत असणाऱ्या सुरक्षित जागी अंडी देणे पसंत करते. त्या दृष्टीने प्रति ६ ते ८ पक्षी एक अंडी देण्याचे खोके/नेस्ट बॉक्स ठेवावे. अंडयावरील कोंबड्यांना सतत स्वच्छ, निर्जंतुक आणि मुबलक पाणी पिण्यास द्यावे. पाण्याची भांडी ही वारंवार स्वच्छ करावीत. शक्यतो पाणी स्वच्छ सुती कपड्याने गाळून घ्यावे. तसेच पाण्यात ई कोलाई किंवा सालमोनेला या आजारांच्या विषाणूंचा प्रादुर्भाव होऊ नये याची काळजी घ्यावी.

कोंबड्यांना संतुलित आहार दिला नाही तर अंडी उत्पादनावर परिणाम होतो. अंडी उत्पादन सुरु होताच म्हणजे २० ते २२ आठवडे वय असताना कोंबड्याना उच्च प्रथिने (१६%) आणि ऊर्जा युक्त संतुलित आहार पुरवावा. मुक्त पद्धत असेल तर नैसर्गिक कीडे, मुंगी, गवत आणि इतर नैसर्गिक आहार यांच्या व्यतिरिक्त प्रति पक्षी किमान ८० ते ९० ग्रॅम संतुलित आहार द्यावा. कोंबड्यांना आहारातून योग्य खनिजांचा पुरवठा न झाल्यास कमी अंडी उत्पादन, कवच विरहित अंड, कमकुवत कवच असणारी व लगेच फुटणारी अंडी देणे या समस्या उद्भवतात. अंडी देणाऱ्या कोंबड्यांना संतुलित आहारा सोबत किमान ५% अतिरिक्त कॅल्शिअम द्यावे. बाजारात उपलब्ध असलेली खनिज मिश्रण/कॅल्शिअम कार्बोनेटचा किंवा शिंपल्याचा चुरा तसेच पाण्यात मिसळलेला कळीचा चुना देखील कॅल्शिअमचा चांगला पर्याय आहे. कोंबड्याना उच्च अंडी उत्पादन देण्याच्या दृष्टीने योग्य प्रमाणात प्रकाश उपलब्ध असणे अत्यंत गरजेचे आहे. अंडयावर आलेल्या कोंबड्यांना दिवसातील किमान १६ तास सलग प्रकाश दिसायला हवा. यादृष्टीने दिवसा नैसर्गिक सूर्यप्रकाश किती तास असतो याचा अभ्यास करून कृत्रिम प्रकाश पुरवावा लागतो. म्हणजे १२ तास सूर्य प्रकाश असेल तर ४ तास कृत्रिम प्रकाश पुरवावा. त्या प्रकाशाची तीव्रता शेडमध्ये सहज वर्तमानपत्र वाचता येईल एवढीच असावी.

पोल्ट्रीफार्म धारकांनी फार्म वर दिवसातून किमान ३ ते ४ वेळा अंडी गोळा करावीत. अंडी लवकर गोळा न केल्यास केव्हा तरी अपघाताने अंडे फुटते आणि कोंबड्याना अंडे खायची सवय लागते, ही विकृति वाढल्यास कोंबड्या स्वतः ची अंडी फोडून खायला सुरुवात करतात. साहजिकच अंडी उत्पादन घटते. अंडयावरील कोंबडी ही वजनाने हलकी असावी. अती वजन वाढल्यास अंडी उत्पादनावर वाईट परिणाम होतो. त्यादृष्टीने कोंबड्या अंडयावर येताना म्हणजे २० व्या आठवड्यात १२०० ते १३०० ग्रॅम वजन असावे. आणि सरासरी कोंबडीचे वजन १५०० ग्रॅम असावे. त्यापेक्षा जास्त वजन झाले तर अंडी उत्पादन कमी होऊ शकते. त्यामुळे कोंबड्यांच्या वजनाकडे

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१६७४ : शिवाजी महाराजांच्या सर्वात धाकट्या पत्नी काशीबाई यांचे निधन
१८३१ : अमेरिकेमधील न्यूयॉर्क शहरात स्थित असलेल्या सिटी बँकेत सर्वप्रथम चोरीची घटना घडली होती. या जोरीमध्ये जवळपास २४५,००० डॉलर चोरीला गेले होते.
१८४२ : लोकहितवादी यांनी 'शतपत्र' या लेखनास प्रारंभ केला.
१८४८ : लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख यांच्या शतपत्रांपैकी पहिले पत्र मुंबईच्या 'प्रभाकर' या वृत्तपत्रात प्रसिध्द झाले.
१९३१ : अमेरिकेतील नेवाडा राज्यात जुगाराला कायदेशीर मान्यता मिळाली.
१९३२ : 'सिडनी हार्बर ब्रिज' सुरू झाला.
१९४४ : सुभाषचंद्र बोस यांच्या आझाद हिंद सेनेने पूर्वोत्तर भारतात राष्ट्रीय ध्वज फडकाविला होता.
१९६२ : पुणे येथील राजा केळकर संग्रहालय जनतेसाठी खुले करण्यात आले.
१९७२ : भारत-बांगलादेश यांच्यात मैत्री करार झाला.
१९९८ : भारतीय जनता पार्टीचे सदस्य अटल बिहारी वाजपेयी दुसऱ्यांदा पंतप्रधान म्हणून निवडून आले होते.
२००१ : वेस्ट इंडीजचा वेगवान गोलंदाज कोर्टनी वॉल्शने दक्षिण अफ्रिकेच्या जॅक्स कॅलिसला पायचीत करुन कसोटी सामन्यातील पाचशेवा बळी मिळविला. कसोटी सामन्यांत ५०० बळी मिळवणारा तो पहिला गोलंदाज बनला.
२००३ : अमेरिकेचे अध्यक्ष जॉर्ज बुश यांनी इराकविरुद्ध युद्ध पुकारले.
२००५ : साली पाकिस्तान देशाने ''शाहीन-२'' क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी केली होती.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८२१ : सर रिचर्ड बर्टन ब्रिटिश लेखक, कवी, संशोधक, मुत्सद्दी आणि गुप्तहेर (मृत्यू: २० आक्टोबर१८९०)
१८९७ : शंकर विष्णू तथा 'दादा' चांदेकर चित्रपट संगीतकार (मृत्यू:)
१९०० : जीन फ्रेडरिक जोलिओट मूलद्रव्याच्या समस्थानिकांच्या शोधाबद्दल नोबेल पारितोषिक (१९३५) मिळवणारा फ्रेन्च पदार्थवैज्ञानिक (मृत्यू: १४ ऑगस्ट १९५८)
१९३६ : ऊर्सुला अँड्रेस स्विस अभिनेत्री
१९३८ : सई परांजपे बालनाटय लेखिका आणि नामवंत चित्रपट दिग्दर्शिका
१९३९ : हिंदी चित्रपट क्षेत्रांतील हास्य कलाकार जगदीप यांचा जन्मदिन.
१९५४ : इंदू शहानी, भारतीय शिक्षणतज्ञ.
१९८२ : फेसबुक चे सहसंस्थापक एड्वार्डो सावेरीन यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१७५४ : खंडेराव होळकर, मल्हारराव होळकरांचा एकुलता एक पुत्र व अहिल्यादेवीचे पती.
१८८४ : केरुनाना लक्ष्मण छत्रे आद्य गणिती, आधुनिक भास्कराचार्य (जन्म: १६ मे १८२५)
१८९० : स्वामी दयानंद सरस्वती यांचे शिष्य तसेच, आर्य समाजाचे प्रमुख नेत्यांपैकी एक पंडित गुरुदत्त यांचे निधन.
१९२८ : महार वतन बिल मांडणी
१९७८ : भारतीय वकील आणि राजकारणी एम. ए. अय्यंगार यांचे निधन. (जन्म: ४ फेब्रुवारी १८९१)
१९८२ : जीवटराम भगवानदास तथा 'आचार्य' कृपलानी स्वातंत्र्यसेनानी, गांधीवादी, समाजवादी आणि पर्यावरणवादी (जन्म: ११ नोव्हेंबर १८८८)
१९९८ : इ. एम. एस. नंबूद्रीपाद केरळचे मुख्यमंत्री व भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे नेते (जन्म: १३ जून १९०९)
२००२ : नरेन ताम्हाणे यष्टीरक्षक आणि फलंदाज (जन्म: ४ ऑगस्ट १९३१)
२००५ : डेलोरेअन मोटर कंपनी चे सहसंस्थापक जॉन डेलोरेअन यांचे निधन. (जन्म: ६ जानेवारी १९२५)
२००८ : सर आर्थर सी. क्लार्क विज्ञान कथालेखक व संशोधक (जन्म: १६ डिसेंबर १९१७)

## शेतकऱ्यांनो, ट्रॅक्टर घेताना या बाबी तपासा

यापूर्वी शेतातील कामे ही जनावरांच्या मदतीने केली जात होती. पण आता मात्र त्यांची जागा ही यंत्रांनी घेतली आहे. शेतात ट्रॅक्टरचा वापर सर्रास केला जातोय. त्यामुळे वेळ आणि मेहनत दोन्हींची बचत होते. परंतु ही यंत्रे विकत घेत असताना बऱ्याचदा आवश्यक असलेल्या गोष्टींकडे लक्ष दिले जात नाही व नंतर परिणामी पश्चाताप करण्याची वेळ येते. त्यामुळे शेती संबंधातील कुठलीही यंत्रे खरेदी करताना या यंत्रात संबंधित असलेली आवश्यक बाबी तपासून घेणे सोयीस्कर ठरते.

ट्रॅक्टर घेतानापुढील गोष्टींची काळजी घ्या : ज्या ट्रॅक्टर कमी केअर मध्ये जास्त वेगवान असेल तर तो ट्रॅक्टर शक्यतो निवडावा. ट्रॅक्टर निवडताना इंजिनाचा देखील विचार करणे आवश्यक आहे. ट्रॅक्टर खरेदी करण्यापूर्वी प्रत्येक जण ट्रॅक्टरची अश्वशक्ती तपासून घेत असतो. ट्रॅक्टर चे अश्वशक्ती करताना जमीन कोरडवाहू आहे कीबागायती आहे या गोष्टींचा विचार करावा लागतो.

ट्रॅक्टरची निगडीत योग्य अवजारे : जास्त गिअरची संख्या असेल सलग दोनगियर मधील वेगाचा फरक असल्यास तो ट्रॅक्टर चांगला आहे. ट्रॅक्टरच्या अश्वशक्ती नुसार ट्रॅक्टरचा अवजार यांची निवड केल्यास वेळेमध्ये बचत होते. म्हणजे प्रति तास २० ते ४० टक्के अधिक काम होईल. अश्वशक्तीनुसार योग्य ट्रॅक्टरचे अवजारे निवड केल्यास इंधनामध्ये १० ते १५ टक्क्यांपर्यंत बचत होते.ट्रॅक्टरची निगा कशी ठेवावी? : ट्रॅक्टरचे योग्य देखभाल केल्यास इंधनामध्ये बचत होते. तसेच ट्रॅक्टर देखील दिर्घकाळ चांगल्या स्थितीत राहू शकते. चुकीच्या अवजारांची निवड केल्यास २५ टक्क्यांपर्यंत इंधन वाया जाऊ शकते. इंजिनचे कम्प्रेशन प्रेशर, इंजेक्ट प्रेशर, वाल, क्लिअरन्स इत्यादींची काळजी घेणे आवश्यक आहे. डिझेलची साठवण टाकी स्वच्छ असावी. डिझेल गळती होत नाही याची काळजी घ्यावी, ट्रॅक्टर कंपनीने सांगितल्याप्रमाणे फिल्टर बदलत रहावे. इंजिन ऑईल फिल्टर वापरताना चांगल्या कंपनीच्या ऑइल वापरले जाईल याची दक्षता घ्यावी.

# रस्त्यांवरील खड्डे बुजविण्यासाठी निधी नाही मात्र चांगल्या रस्त्यावरच दुबार काम

## नगरपालिकेचा मनमानी कारभार ; सोमवारी आंदोलनाचा इशारा






बीड । प्रतिनिधी


बीड शहरातील अंतर्गत रस्त्यांची मोठ्या प्रमाणावर दयनीय अवस्था झाली आहे. रस्त्यांवर खड्ड्यांचे साम्राज्य असल्याने शहरातील बहुतांश रस्त्याची चाळण झालेली आहे.त्यामुळे वाहनचालकांना मुठीत जीव घेऊन कसरत करत वाहन चालवावे लागते. शहरातील सर्वाधिक वर्दळीचा असणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराज चौक ते बशीरगंज रस्त्याची पुर्ण चाळण झालेली आहे.या रस्त्यावर खड्डे,वाळु,वाळु मिश्रित खडी, असल्याने धुराळा उडत असुन नागरीकांना श्वसनाचे आजार जडण्याचा धोका आहे.या रस्त्यांवरील खड्डे बुजविण्यात यावेत अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तसेच नागरीकांनी वारंवार नगरपरिषद प्रशासनाला केलेली आहे.

मात्र नगरपरिषद प्रशासन दुरुस्तीसाठी निधी नसल्याचे रडगाणे गात आहे.मात्र याचवेळी प्रमुख रहदारीच्या रस्त्यावरील खड्डे बुजविण्या ऐवजी नगरपालिकेने नगरपालिका कार्यालयासमोरील केवळ नगरपालिकेत येणाऱ्या वाहनांची वर्दळ असणाऱ्या आणि रस्त्यावर कुठेही खड्डे नसताना चांगल्या सुस्थितीत असलेल्या सिमेंट रस्त्यावरच पुन्हा दुबार सिमेंट रस्त्याचे काम केले आहे.

त्यामुळे एकंदरीतच प्रमुख रस्त्यांवरील खड्डे बुजविण्यासाठी निधी नसल्याचे कारण सांगणा-या नगरपालिका प्रशासनाने चांगल्या रस्त्यावरच दुबार रस्ता करून जनतेच्या पैशाची उधळपट्टी का केली?? हा प्रकार ठेकेदारांचे खिसे भरण्याचा प्रकार असल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केला असून मुख्य रस्त्यांवरील खड्डे तातडीने बुजविण्यात यावेत या मागणीसाठी सोमवारी या प्रकरणी नगरपरिषद कार्यालयावर लक्ष्यवेधी आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.

# नाग जातीच्या नर-मादी सापांची दोन तास प्रणयक्रीडा!

## रस्त्याच्या बाजूचे हे विहंगम दृश्य; सौताडा येथील दुर्मिळ क्षण



पाटोदा । प्रतिनिधी

निसर्गाची अद्भुत किमया अनेक प्रसंग आणि घटनांच्या माध्यमातून अनेक वेळा पाहायला भेटते.. असाच एक प्रसंग साप जातीच्या दोन पशु मधील प्रणय क्रीडाच्या संदर्भात घडल्याचा दुर्मिळ प्रसंग काल दुपारी घडून आला आहे. बीड जिल्ह्याच्या पाटोदा तालुक्यातील श्रीक्षेत्र सौताडा येथील पत्रकार संजय सानप यांच्या निवासस्थानाच्या समोर रस्त्याच्या बाजूलाच सहा ते सात फूट लांबी असलेले दोन नाग जातीचे साप नर आणि मादी प्रणय क्रीडेत एवढे रमून गेले की, रस्त्यांनी येणाऱ्या जाणाऱ्या अनेक व्यक्तींनी पाहिल्यानंतर ही ते अजिबात घाबरून पळून जात नव्हते.

या प्रसंगाचा ''आखो देखा हाल'' पत्रकार संजय सानप यांनी आपल्या कॅमेर्यात कैद केला! अर्धा तासाचा हा व्हिडिओ माध्यमांमध्ये टाकल्यानंतर अनेकांनी तो पाहिला. निसर्गाच्या अद्भुत किमयाची ही साक्ष असल्याचे स्पष्ट झाले. मुळातच पशु पक्षी आणि प्राण्यांची आवड प्रेम आणि दया असलेले पत्रकार संजय सानप यांनी त्या दोन्हींना कसलाही त्रास न होऊ देता सर्प मित्रांना भ्रमणध्वनीवरून संपर्क साधण्याचा प्रयत्न केला; परंतु दुर्दैवाने तो होऊ शकला नाही. एक दीड तासापेक्षाही अधिक या दोन नर-मादीसापामधील हा प्रसंग पाहण्यासाठी मोठी गर्दी झाली. या घटनेच्या माध्यमातून मात्र निसर्गाने मनुष्य जातीप्रमाणे इतर प्रत्येक पशु पक्षी प्राण्यांमध्ये एक नियम आणि शिस्त लावून दिलेली असल्याचे निसर्गप्रेमींनी सांगितले. पशु पक्षी प्राणी हे फार मोठी मनुष्य समाजाची उपलब्धता आहे. आपला देश शेतीप्रधान आहे आणि अशा पशु पक्षी प्राण्यांना शेतकऱ्यांचा मित्रही म्हटले जाते. त्या दृष्टीने प्राणीमात्रावर दया आणि संवर्धन करण्याच्या हेतूने शासनाने विशेष अशी काळजी घेऊन नवीन नियम तयार करावेत अशा भावना यानिमित्ताने व्यक्त झाल्या

# प्राईड ऑफ माजलगाव पुरस्कार देऊन महिलांचा केला सन्मान

## रोटरी क्लब, मंगलनाथ मल्टिस्टेट व इगलवूड स्कुलच्या वतीने अनोखा उपक्रम



माजलगाव ( प्रतिनिधी ) रोटरी क्लब,मंगलनाथ मल्टिस्टेट व इगलवूड स्कुलच्या वतीने अभिमान माजलगावचा प्राईड ऑफ माजलगाव या कार्यक्रमाचे आयोजन दि १६ मार्च रविवार रोजी इंगलवूड स्कुल फुले पिंपळगाव याठिकाणी करण्यात आले होते.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून मंगलनाथ मल्टिस्टेटचे व्यवस्थापकीय संचालक तथा रोटरी क्लब ऑफ माजलगाव सिटीचे विद्यमान अध्यक्ष ऑड रवींद्र कानडे तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ संध्या हुबेकर, सौ.सुवर्णा क्षीरसागर, सौ.रागीणी लोढा, सौ.आदिती देशमुख, सौ. सत्यभामा डावरे,सौ.सविता मुंदडा,सौ.शितल दाभाडे,डॉ.सुशील लोढा,डॉ अर्चना पवार,रो.स्मिता लिंबगावकर,रो.डॉ. अंजली अकोलकर, सौ.स्मिता कानडे, प्राचार्य सत्यजित, उपप्राचार्या प्रणिता आदी मान्यवर व्यासपिठावर उपस्थित होते.या कार्यक्रमाचे अध्यक्ष ॲड.रवींद्र कानडे यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना सांगितले की,आजच्या काळात सामाजिक, आर्थिक,राजकीय, सांस्कृतिक क्षेत्रात महिला अग्रेसर आहेत त्यांच्या परिश्रम पूर्ण कार्याचे कौतुक करणे आपले कर्तव्य आहे त्यांच्या कार्यात सातत्यता रहावी व त्यांचे मनोबल वाढून त्यांच्या अंगी आत्मविश्वास निर्माण व्हावा याकरीता त्यांना प्रेरणारूपी सन्मानित करणे महत्व पूर्ण ठरते.माजलगाव शहर व परिसरातील कर्तृत्ववान महिला म्हणून सौ.ऐश्वर्या जयसिंग सोळंके, सौ.गौरी सुहास देशमुख,श्रीमती संगीता निळकंठ जाधव,डॉ.सौ.प्रीती राजेश रुद्रवार,सौ. रुपाली शरद कचरे,सौ.अर्चना बोरा,सौ.सुरेखा गवळी,कु. वैभवी टाकणखार,वैष्णवी होके या महिलांचा सन्मान करण्यात आला.या कार्यक्रमाचे प्रकल्प प्रमुख डॉ सुशील लोढा यांनी संपूर्ण कामकाज पहिले त्याप्रसंगी रोटरी क्लबचे सर्व सभासद उपस्थित होते. या कार्यक्रमास माजलगाव शहरातील व परिसरातील नागरिक व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.मंगलनाथ मल्टीस्टेट व इगलवूड स्कुलचे सर्व कर्मचारी वर्ग यांनी हा कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता परिश्रम घेतले.

# अठरापगड जातींना सोबत घेऊन आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका लढणार- राजेंद्र मस्के

बीड। प्रतिनिधी


राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने सामाजिक न्याय विभागाची बैठक राष्ट्रवादी भवन बीड येथे पार पडली, यावेळी सामाजिक न्याय विभागाचे प्रांत अध्यक्ष श्री पंडित कांबळे सर यांच्या उपस्थितीत बैठक बोलण्यात आली होती. यावेळी मराठवाड्याच्या सर्व जिल्ह्यातून प्रमुख अधिकारी उपस्थित होते. यावेळी बीड जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के असे म्हणाले की राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष हा आदरणीय शरदचंद्र पवार साहेब यांच्या विचारधारेवर चालतो त्यांनी अठरापगड जातींना सोबत घेऊन त्यांच्या न्याय हक्कासाठी सातत्याने प्रयत्न केला आहे, मराठवाड्याच्या विद्यापीठाला डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे नाव देण्यासाठी पुढाकार घेणारा नेता म्हणून पवार



साहेबांची ओळख आहे,नामांतरांच्या वेळेला राजकीय किंमत मोजावी लागली तरी चालेल परंतु मराठवाडा विद्यापीठाला डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे नाव देण्याचे काम पवार साहेबांनी केले आहे, पवार साहेब नेहमीच पुरोगामी विचार जोपासणारा नेता आहे अशा नेत्याच्या नेतृत्वाखाली आपण सर्व सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात काम करतो, येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकांमध्ये देखील वंचित समाजाला प्रतिनिधित्व देण्याचे काम राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष करणार असल्यास मत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे बीड जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी व्यक्त केले,यावेळी प्रांताध्यक्ष श्री पंडित कांबळे सर यांनी असे सांगितले की माझ्यासारख्या सामान्य कुटुंबातील व्यक्तीला पवार साहेबांनी सामाजिक न्याय विभागाची जबाबदारी दिली आहे, ती योग्यरित्या मी पार पाडत आहे श्री कांबळे यांनी बाळासाहेब शिनगारे यांना जिल्हा कार्याध्यक्षाची जबाबदारी दिली होती, त्यांचे काम पाहून बाळासाहेब शिनगारे यांची सामाजिक न्याय विभागाच्या बीड जिल्हाअध्यक्ष पदाचे नव्याने घोषणा केली आहे. बाळासाहेब शिनगारे हे बीड जिल्ह्यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष वाढवण्यासाठी दिनदलित वंचित घटकांना एकत्र करून पवार साहेबांचे हात बळकट करणार आहेत, अशा भावना श्री कांबळे यांनी व्यक्त केल्या.

# इकरा इम्रान पठाण या चिमुकलीचा पहिला रोजा पूर्ण

पाटोदा । प्रतिनिधी



मुस्लिम धर्माच्या पवित्र रमजान महिन्याला अनन्यसाधारण महत्त्व आहे. या महिन्यात मुस्लिम समाजातील लहान चिमुकल्यांना वगळून इतर सर्वांना रोजा (फर्ज) सक्तीचे असतात. परंतु घरात पालकांचे पाहून हे लहान चिमुकले ही मोठ्यांचे अनुकरण करीत रोजा धरतात. अश्याच प्रकारे पाटोदा येथील युवा नेतृत्व तथा दलित मित्र एकबाल पेंटर फाउंडेशन चे उपाध्यक्ष जुनेद (भैय्या) पठाण यांची लाडकी बहिण चिमुकली इकरा पठाण (वय ७ वर्षे) यांनी तिच्या आयुष्यातील पहिला रोजा काटेकोरपणे पुर्ण केला आहे. दिवससभर अन्नाचा कण व पाण्याचा एक थेंबही न घेता काटेकोरपणे आपल्या आयुष्यातील पहिला रोज यशस्वी पुर्ण केल्याबद्दल तिच्या कुटुंबाच्या वतीने व आजी,आत्य आई,वडिल मामा,मामी भाऊ व सर्व सय्यद व मित्र परिवार कडुन इकरा चे कौतुक व अभिनंदन केले आहे.

# शेकापचे उपविभागीय कार्यालयासमोर आज हलगी बजाओ आंदोलन

माजलगाव । प्रतिनिधी

तहसील कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी यांच्या मनमानी पणाला लगाम लावण्यात यावा,तसेच संजय गांधी,इंदिरा गांधी योजनेत झालेल्या भ्रष्टाचाराची सखोल चौकशी करून संबंधितांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्यात यावेत,सज्जावर वास्तव्यास न राहणाऱ्या तलाठी, मंडळ अधिकाऱ्यांवर फसवणुकीचे गुन्हे दाखल करण्यात यावेत.या मागण्यासाठी शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर आज दि १९ मार्च बुधवार रोजी हलगी बजाओ आंदोलन करण्यात येत असून या आंदोलनात संजय गांधी,इंदिरा गांधी योजनेतील वंचित असलेले पात्र लाभार्थी,शेतकरी बांधवांनी आंदोलनात सहभागी होऊन तहसील



कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी यांची मनमानी व भ्रष्टाचार थांबवून संजय गांधी योजनेत पात्र व गरजवंत लाभार्थ्यांना समाविष्ट करण्यासाठी, तालुक्यातील शेतकरी तलाठी मंडळ अधिकाऱ्याच्या शोधात दिवस फिरून देखील त्यांची भेट होत नसल्याने व त्यांचा भ्रमणध्वनी ते जाणीवपूर्वक उचलत नसल्याने वारंवार तक्रार करूनही तहसील कार्यालयातील मनमानी व संजय गांधी योजनेतील भ्रष्टाचार आणि शेतकऱ्यांना सातत्याने छळणाऱ्या, खाजगी कार्यालयावर खाजगी व्यक्ती नेमुन शुल्लक कारणांसाठी शेतकऱ्याकडून भरमसाठ पैसे घेणाऱ्या तलाठी, मंडळ अधिकाऱ्यांवर फसवणुकीचे गुन्हे दाखल करण्यासाठी शेतकरी कामगार पक्षाच्यावतीने उपविभागीय अधिकारी इंगोले यांना आठ दिवसांपूर्वीच निवेदन देऊनही त्यांनी संबंधितावर कार्यवाही न केल्यामुळे आज दि १९ मार्च बुधवार रोजी सकाळी १०:०० वाजता उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर हलगी बजाव आंदोलन करण्यात येत आहे, तरी या आंदोलनात आपण हजारोच्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई ॲड नारायण गोले पाटील,भाई मुंजा पांचाळ,भाई श्रीराम शेवाळे,भाई विष्णू शेळके,भाई चांगदेव शेजुळ, भाई अशोक कुलकर्णी,भाई सतीश शेजुळ,भाई माऊली चंदनशिव, भाई सुदाम चव्हाण, भाई राहुल सोळंके, आदींनी केले आहे..


## जाहीर प्रगटन

**मा. श्रीम. डी. के. पाटील साहेब ०६ वे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज २३६/२०२५**

**ॲड. उबाळे एम आर**

**श्रीमंत व इतर विरुध्द निरंक**

अर्जदार : (१) श्रीमंत पि. मच्छिंद्रनाथ उबाळे वय ५५ धंदा शेती, २) दत्तु पि मच्छिंद्रनाथ उबाळे वय ४९ धंदा नौकरी, ३) केशरबाई भ्र. मच्छिंद्र उबाळे वय ७३ धंदा घरकाम ४) आशा भ्र. विष्णु उबाळे वय ५७ धंदा घरकाम, ५) श्रीपाद पि विष्णु उबाळे वय ३५ धंदा शेती वरील सर्व रा. च-हाटा ता. जि. बीड ६) कांता भ्र. शेषेराव मस्के वय ७१ धंदा घरकाम रा पालवण ता.जि. बीड ७) निलावती भ्र. विलास सुस्कर वय ५८ धंदा घरकाम रा. धांडे गल्ली बीड ता.जि. बीड ८) प्रमिलाबाई भ्र विलास कदम वय ६४ धंदा घरकाम रा. सौदांणा ता. पाटोदा जि. बीड

विरुध्द निरंक

मागणी अर्ज:- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र (Heirship certificate) मिळणे बाबत वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत नामे मच्छिंद्र उर्फ मच्छिंद्रनाथ पि. एकनाथ उबाळे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे. ज्याअर्थी मयत नामे मच्छिंद्र उर्फ मच्छिंद्रनाथ पि. एकनाथ उबाळे रा, चऱ्हाटा ता. जि. बीड यांचा मृत्यु दिनांक : २२.१०.२०२३ रोजी चऱ्हाट ता. जि.बीड येथे झाला. अर्जदार क्र. १ व २ हे मयताचे मुले आहेत. अर्जदार क्र. ३ ही मयताची पत्नी, अर्जदार क्र. ४ ही मयताच्या मयत मुलाची पत्नी म्हणजेच मयताची सुन असुन अर्जदार क्र. ५ हा नातु आहे. तसेच अर्जदार क्र . ६ ते ८ या मयताच्या विवाहीत मुली आहेत. मयतास सदर अर्जदारांशिवाय ईतर कुणीही वारस नाही. वरील अर्जदारांना मयताचे मृत्युनंतर शासकीय व निमशासकीय कामाकरीता सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे असे अर्जदार यांनी अर्जात नमुद केलेले आहे: त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार व गैरअर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्यांचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत मच्छिंद्र उर्फ मच्छिंद्रनाथ पि. एकनाथ उबाळे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी. **आज दिनांक १४/०२/२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले. सदर प्रकरणाची पुढील तारीख दिनांक १७/०४/२०२५**

आदेशावरून

स्वाक्षरित
**क लिपीक**

(शिक्का)

स्वाक्षरित
**अधिक्षक**
दिवाणी न्यायालय व. स्तर बीड


# धिरज देशमुख यांची अंबाजोगाई पिपल्स बँकेस सदिच्छा भेट



अंबाजोगाई । प्रतिनिधी

लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघाचे माजी आमदार तथा लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष धिरज विलासराव देशमुख यांनी नुकतीच अंबाजोगाई पिपल्स को ऑप बँकेस सदिच्छा भेट दिली. याप्रसंगी बँकेचे मुख्यालय सहकार भवन येथे अंबाजोगाई पिपल्स बँकेचे संस्थापक अध्यक्ष राजकिशोर मोदी यांच्या हस्ते धिरज देशमुख यांचा फेटा बांधून तसेच शाल व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी पिपल्स बँकेचे उपाध्यक्ष प्रकाश सोळंकी,कापूस पणन महासंघाचे संचालक ॲड विष्णुपंत सोळंके , बीड जिल्हा पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष कचरूलाल सारडा, माजी उपनगराध्यक्ष मनोज लखेरा, सुनील वाघाळकर, गणेश मसने, ॲड अनिल लोमटे हे उपस्थित होते.

या सदिच्छा भेटी दरम्यान धिरज देशमुख तथा राजकिशोर मोदी यांच्यामध्ये बँकिंग क्षेत्रातील विविध विषयावर सखोल चर्चा झाली. लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक तथा अंबाजोगाई पिपल्स को ऑप बँकेच्या विविध योजनाबाबत देखील चर्चा झाली. ५५० कोटीच्या ठेवी तसेच १९ कोटी गुंतवणूकीच्या माध्यमातून आज अंबाजोगाई पिपल्स बँक महाराष्ट्र भर ग्राहकांना सेवा पुरवत असल्याचे राजकिशोर मोदी यांनी याप्रसंगी नमूद केले. अंबाजोगाई पिपल्स बँकेच्या कार्यरत वीस शाखाबद्दल सविस्तर माहिती देतांनाच भारतीय रिझर्व्ह बँकेने नुकत्याच निलंगा, मुरुड, केज या नवीन तीन शाखांना परवानगी दिल्याचे राजकिशोर मोदी यांनी सांगितले. अंबाजोगाई पिपल्स को ऑप बँकेचा सुरू असलेल्या व्यवसाय, बँकेची सतत वाढत असलेली वृद्धी तसेच हजारो ग्राहकांनी बँकेवर ठेवलेला विश्वास हे पाहून धिरज विलासराव देशमुख यांनी अतिशय आनंद व्यक्त करत यापूर्वी बँकेची दिवसेंदिवस अशीच भरभराट होवो अशा सदिच्छा व्यक्त केल्या. दोन्ही नेत्यांच्या या भेटीदरम्यान सध्याच्या राजकीय परिस्थितीवर देखील चर्चा झाली. गढूळ झालेले सध्याचे राजकारण व त्यास दिला जाणारा जातीय रंग याबाबत चिंता व्यक्त करत हे चित्र बदलण्यासाठी प्रयत्न करण्याची आवश्यकता असल्याचे देखील याप्रसंगी चर्चिले गेले.




# शक्तीकुंज वसाहती जवळील रस्त्याचा पॅच तात्काळ दुरुस्त करा - ॲड. संकाये

## राष्ट्रीय महामार्गाच्या अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे नागरिक हैरान!

परळी। प्रतिनिधी

परळी शहरातील थर्मल कॉलनी परिसरातील शक्ती कुंज वसाहती जवळील परळी गंगाखेड राष्ट्रीय महामार्गाचे काम सुरू असून त्या महामार्गावर शक्ती कुंज वसाहतीजवळ पॅच सोडले आहेत. राष्ट्रीय महामार्गाचे सर्व अधिकाऱ्यांनी या कामाकडे दुर्लक्ष केले असून हा पॅच तात्काळ दुरुस्त करण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते ॲड.मनोज संकाये यांनी केली आहे.

शक्ती कुंज वसाहती मध्ये भेल सेकंडरी इंग्लिश स्कूल, न्यू हायस्कूल तसेच थर्मल येथील अधिकाऱ्यांची निवासस्थाने आहेत. या रस्त्यावरून रहदारी मोठ्या प्रमाणावर आहे. राष्ट्रीय महामार्ग परळी ते गंगाखेड काम चालू असल्याने याच ठिकाणी एक पॅच सोडण्यात आला आहे. त्यामुळे तेथील नागरिकांची मोठ्या प्रमाणावर गैरसोय होत आहे. अनेक वाहनधारकांचे अपघात होत आहेत. विद्यार्थी तसेच नागरिक यांचेही अपघात होत असल्याने हा पॅच नागरिकांसाठी डोकेदुखी ठरत आहे त्यामुळे राष्ट्रीय महामार्गाचे अधिकारी यांनी तात्काळ लक्ष देऊन हा सोडलेला पॅच तात्काळ दुरुस्त करावा अशी मागणी त्यांनी केली आहे.

# सिरसमार्ग उपोषणकर्त्यांची प्रकृती खालावली, उपोषणस्थळी उपचार

**बीड । प्रतिनिधी**

**गेवराई तालुक्यातील सिरसमार्ग येथे १४० गावातील शेतकऱ्यांनी एकत्र येत उपोषण सुरू केले आहे. उपोषण सुरू होऊन पंधरा दिवस झाले, मात्र शासनाने जिल्हाधिकारी व कार्यकारी अभियंता यांनी दखल न घेतल्याने सोमवारपासून उपोषणकर्त्या शेतकर्यांनी जलत्याग सुरू केले आहे. पाणी न पिल्याने अशक्तपणा येऊन रक्तदाब कमी झाला. त्यामुळे उपोषणस्थळी डॉक्टरांनी सलाईन दिले आहे.**

शिरूर निमगाव ते माजलगाव पर्यंतच्या सिंदफणाकाठच्या १४० गावातील शेतकऱ्यांनी एकत्र येत लोकलढा आंदोलन सुरू केले आहे. सिंदफणा नदीमध्ये बारमाही पाणी नसल्याने शेतकऱ्यांना अनेक संकटाना सामोरे जावे लागते. त्यामुळे शासनाने सिंदफणा नदीवर बंधारे बांधावेत, जायकवाडीच्या उजव्या कालव्यातून उपकालवा करावा, जायकवाडी धरणाचे पाणी सिंदफणा नदी पात्रात सोडावे, नदीजोड प्रकल्प गतीने राबवावे व मराठवाडा वॉटर ग्रीड योजनेत कृषी व उद्योगांना पाणी द्यावे आदी मागण्यांसाठी शेतकऱ्यांनी लोकलढा आंदोलन सुरू केले आहे. या मागण्या शासनाने मान्य कराव्यात यासाठी सिरसमार्ग येथे सोळा दिवसांपासून उपोषण सुरू आहे. गेल्या दोन दिवसांपासून उपोषणकर्त्यांनी जलत्याग केले आहे. शरिरातील पाणी कमी झाल्याने उपोषणकर्ते देविदास चव्हाण यांना डॉ. सुरज बनसोडे यांनी उपोषणस्थळी सलाईन लावले. यासह ईतर उपोषणकर्ते यांचीही तपासणी करून औषधोपचार केले. यावेळी भाऊसाहेब जरांगे पाटील, राजसाहेब काका पवळ, समन्वयक दिनेश गुळवे, महादेव रडे, विजयकुमार करपे, चंद्रकांत मुळे. गणेश कारंडे, विठ्ठल तांबारे, शहादेव परदेशी, कृष्णा



टाकसाळ, तुकाराम टाकसाळ, बाबा पवळ, गणेश महाराज कोळेकर, संतोष कारंडे, संतोष रडे, पांडुरंग पन्हाळे मामा, ओंकार चिखले, रामप्रसाद देवकर. निवृत्ती कोळेकर आदी उपस्थित होते.

## रक्तदाब झाला कमी, शेतकऱ्यांतून चिंता व्यक्त

### शासनाने दखल घ्यावी

शेतकऱ्यांच्या मागण्यांसाठी संभाजीनगर येथे उपोषण केले होते. मात्र त्यानंतर शासनाने काही कार्यवाही केली नाही. त्यामुळे आता पुन्हा उपोषण सुरू केले आहे, वरिष्ठ स्तरावरील अधिकार्यांनी याची दखल घ्यावी असे मत महादेव रडे, देविदास चव्हाण यांनी व्यक्त केले.

### योजनांसाठी निधी मंजूर करावा

या अर्थसंकल्पात मराठवाड्यावर सिंचनाबाबत मोठा अन्याय झाला आहे. अर्थसंकल्पिय अधिवेशन सुरूच असल्याने सिंचनासाठी निधी मंजूर करावा अशी मागणी समन्वयक दिनेश गुळवे यांनी केली.



**अंबाजोगाई –कु.वैष्णवी विष्णू उगले या भारतीय नौदलाचे प्रशिक्षण पुर्ण करून प्रथमच गावात आल्यावर ग्रामस्थांच्या वतीने त्यांचे जंगी स्वागत करण्यात आले. यावेळी पाटोदा गावच्या सरपंच त्रिवेणी दशरथराव उगले यांनी यथोचित सत्कार केला. याप्रसंगी दशरथराव उगले, हानुमंत देशमुख, अविनाश उगले, व्यंकट तात्या उगले, सलीम शेख, ज्योतीराम जामदार, बालासाहेब घोरपडे, राम ढोबळे आदी उपस्थित होते.**

# अश्लील भाषेत बोलून फिर्यादीस लग्न होऊ न देण्याची धमकी देऊन विनयभंग केल्याच्या आरोपातून निर्दोष मुक्तता

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

येथील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी एस. डी. मेहता साहेब यांचे न्यायालयात आर.आर.सी. नं. २९२/२०१९ सरकार वि. गोविंद या प्रकरणाची सुनावणी होऊन आरोपी गोविंद विश्वनाथ गिरी रा. तत्तापुर ता.रेणापूर जि. लातूर याची कलम ३५४ (ए), ३५४ (१) (डी), ३८४, ५०६ भादवी सह कलम ६७ आय टी अॅक्ट मधून मा. एस.डी. मेहता साहेब यांनी दि.१३/०३/२०२५. रोजी सबळ पुराव्या अभावी निर्दोष मुक्तता केली.

सदर प्रकरणाची थोडक्यात हकीकत अशी की, अंबाजोगाई शहरातील मौजे शेपवाडी ता अंबाजोगाई येथे आरोपी गोविंद गिरी याने त्याचे मोबाईल नंबर वरुन फिर्यादीचे असलेले मोबाईल वर फोन करुन फिर्यादीच्या नकळत आरोपीने काढलेले फोटो यातील फिर्यादीस पाठवल्याने फिर्यादीच्या मनास धक्का बसला व सदचे फोटो फिर्यादीच्या घरच्याना व ईतराना दाखविण्याची भिती दाखवून यातील आरोपीने फिर्यादीकडुन वेळोवेळी १,९०,०००/–रु घेतलेले आहेत. ते परत मागीतले असता त्याने माझे पैसे परत दिले नाहीत. नंतर यातील आरोपीने फिर्यादीच्या फोटोचा गैरवापर करुन मोबाईलवर तू आवडतेस मल तुझ्याशी लग्न करायचे आहे मी तुझे लग्न होवु देणार नाही असी धमकी दिली व वारंवार अश्लिील भाषेत बोलुन फिर्यादीचा विनयभंग केला म्हणुन यातील आरोपी विरुध्द भादवी कलम ३५४ (ए), ३५४ (१) (डी), ३८४,५०६ भादवी सह कलम ६७ आय टी अॅक्ट प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला. सदरील प्रकरणाची सुनावणी मा. न्यायालयात झाली असता फिर्यादी पक्षातर्फे एकूण सहा साक्षीदार तपासण्यात आले. परंतु फिर्यादी पक्ष हा गुन्हा सिद्ध करू न शकल्याने आरोपी गोविंद विश्वनाथ गिरी रा. तत्तापुर ता.रेणापूर जि. लातूर याची कलम ३५४ (ए), ३५४ (१) (डी), ३८४, ५०६ भादवी सह कलम ६७ आय टी अॅक्ट मधून मा. एस.डी. मेहता साहेब यांनी दि.१३/०३/२०२५. रोजी सबळ पुराव्या अभावी निर्दोष मुक्तता केली. सदरील प्रकरणात आरोपी तर्फे अॅड.नितीन जाधव यांनी काम पाहिले त्यांना , अॅड. जी.व्ही. बुरकुले. ऍड बाळासाहेब गायके यांनी सहकार्य केले.



रिजवान पटेल पिंपळा धा. ता.अंबाजोगाई यांचे चि. मोहम्मद अली वय वर्ष ६ रमजान चा पहीला रोज़ा पुर्ण केला बद्दल सर्वत्र कौतुक होत आहे.

# स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीसाठी कामाला लागा– अशोक पटवर्धन

## बीड जिल्हा शिवसेनेची आढावा बैठक संपन्न

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्यामध्ये महायुतीची सत्ता प्रस्थापित झाली असून शिवसेना महायुतीचा एक भाग आहे. यामुळे आपण सर्वजण सत्तेत आहोत. या सत्तेचा लाभ जनते पर्यंत पोहचवा. काही महिन्यातच स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका होणार आहेत. त्यामुळे आतापासूनच तयारीला लागा असे नवनिर्वाचित शिवसेना मराठवाडा विभागीय सचिव अशोक पटवर्धन साहेब यांनी आढावा बैठकीत मार्गदर्शन केले. याबरोबरच पुढील महिन्यात पुन्हा एकदा तालुका निहाय बैठकीचे आयोजन करण्यात येणार असून त्यामध्ये सर्वांनी आपआपल्या कामाचा अहवाल घेऊन उपस्थित राहायचे आहे असे देखील अशोक पटवर्धन यांनी सर्व पदाधिकारी लोकप्रतिनिधी यांना सांगितले.



काल दि. १८ रोजी दु. १२.०० वाजताच्या दरम्यान शिवसेना मध्यवर्ती कार्यालय जालना रोड बीड येथे शिवसेना मराठवाडा विभागीय सचिव अशोक पटवर्धन साहेब, शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, सचिन भैय्या मुळूक, स्वप्नील भैय्या गलधर यांच्या प्रमुख उपस्थितीत बीड जिल्हा शिवसेनेची आढावा बैठक संपन्न झाली.

पान ३ वर

# ग्रामपंचायत सरपंचपद आरक्षण सोडत कार्यक्रमाचे २५ मार्च रोजी आयोजन– तहसीलदार वैशाली पाटील

**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टी तालुक्यातील आगामी ग्रामपंचायत निवडणुकी साठी सरपंच पदाचे आरक्षण सोडत कार्यक्रमाचे आयोजन आष्टी तहसील कार्यालयामध्ये दि.२५ मार्च २०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता करण्यात आले असून यावेळी नागरिकांनी उपस्थित राहावे असे आवाहन आष्टी तहसीलदार श्रीमती वैशाली पाटील यांनी केले आहे.. याविषयी अधिक माहिती देताना त्यांनी दि.१७ मार्च २०२५ रोजी प्रेस नोट जारी केली असून त्यामध्ये म्हटले आहे की, महाराष्ट्र शासन ग्रामीण विकास विभाग,तसेच बीड जिल्हाधिकारी कार्यालय यांचे निर्देशाप्रमाणे..

मुंबई ग्रामपंचायत सरपंच व उपसरपंच नियम १९६४ मधील नियम ३ (अ) प्रमाणे तालुक्यातील सरपंचाची पदे वेगवेगळ्या प्रवर्गासाठी तसेच समांतर प्रवर्गासाठी आगामी पाच वर्षाकरिता सन २०२५ ते २०३० या कालावधीसाठी गठीत होणाऱ्या ग्रामपंचायती करता सरपंच पदासाठी सोडत पद्धतीने आरक्षण कार्यक्रम दि.२५ मार्च २०२५ सकाळी ११.०० वा.आष्टी तहसील कार्यालय सभागृहामध्ये आयोजित करण्यात आला आहे.. आष्टी तालुक्यातील आगामी १२५ ग्रामपंचायत सरपंच पदाच्या आरक्षण सोडतीचा कार्यक्रम यामध्ये जाहीर होणार आहे. या वेळी उपस्थित रहावे असे आवाहन या प्रेस नोट व्दारे करण्यात आले आहे.

# राजेवाडी येथील गणेश आण्णा थेटे यांचे निधन

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील राजेवाडी येथील रहीवाशी गणेश आण्णा थेटे (वय ५२ वर्षे) यांचे मंगळवार, दि. १८ मार्च रोजी राहत्या घरी हृदयविकारामुळे निधन झाले. त्यांच्यावर राजेवाडी येथील स्मशान भुमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.



गणेश थेटे यांना संपुर्ण गावात आण्णा या नावाने ओळखले जात होते. आण्णाचा स्वभाव शांत, संयमी, मनमिळाऊ असल्याने संपूर्ण गावात ते सर्व परिचित होते. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, जावई, सुना, नातवंडे, पंतु असा मोठा परीवार आहे.

# अंमळनेर येथे देशी दारू पकडली

अंमळनेर । प्रतिनिधी

काल दिनांक १७/३/२०२४ रोजी गुप्त बातमी दाराच्या माहितीवरून अंमळनेर बाजार तळ या ठिकाणी चार चाकी गाडीमध्ये दारूचे बॉक्स आणल्याची माहिती मिळाल्याने सदर ठिकाणी सपोनि सपकाळ साहेब यांच्या आदेशाने पीएसआय चव्हाण सर सोबत पोलीस कॉन्स्टेबल बहिरवाळ, खाडे, हवालदार डोंगरे असे रात्री अकरा वाजता छापा मारला. बाजार तळ या ठिकाणी देशी दारू बॉबी संत्रा सोबत बाळगणारा हरिभाऊ एकनाथ दिवटे, राहणार आव्हाना तालुका शेवगाव, जिल्हा



अहिल्यानगर हा मिळून आला. त्याचे ताब्यात देशी दारू बॉबी संत्रा कंपनीच्या ४८ बाटल्या असलेला एक बॉक्स मिळून आला. त्यावरून सदर ठिकाणची स्विफ्ट डिझायर गाडी व आरोपी पोलीस स्टेशनला घेऊन जाऊन दारूबंदी कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. एकूण चार लाख चार हजार आठशे(४०४८००रु) रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार साईनाथ जाधव करीत आहेत.

# आष्टीतील रिदान शेख याचा पहिला रोजा पूर्ण

**म्हसोबावाडी । प्रतिनिधी**

आष्टी शहरातील रिदान रिजवान शेख या ८ वर्षे वयाच्या असलेल्या मुलाने आपला पहिला रोजा शुक्रवारी पूर्ण केला, सध्या मुस्लीम बांधवांचा पवित्र रमजान महिना चालू आहे. हा निरंक उपवासाचा महिना असतो यात साधारणता पहाटे ४ : ४५ मिनिटे ते संध्याकाळी ७ वाजेपर्यंत पाणी किंवा अन्न काहीही ग्रहण केले जात नाही आणि सध्या मार्च महिन्याच्या रणरणत्या उन्हाळ्यात हे उपवास किंवा रोजे खूप कठीण व असह्य असतात तरी सुद्धा आष्टी येथील अॅड रिजयान शेख



बांचा मुलगा रिदान शेख याने आपला पहिला रोजा पूर्ण केला. एवढ्धा लहान वयात कडक उन्हाळ्यात रोजा पूर्ण केल्याबद्दल सर्व स्तरातून रिदान याचे आष्टी तालुक्यासह सर्वस्तरातून कौतुक होत आहे.

# पाटोदा कृषी विभागात अधिकारी व कर्मचारी गैरहजर

**पाटोदा । प्रतिनिधी**

शेतकऱ्यांशी निगडित असणारे पाटोदा येथील तालुका कृषी कार्यालय येथे कामानिमित्ताने अचानक पाटोदा नगरपंचायत चे उपनगराध्यक्ष रोहिदास गिते व सभापती हनुमंत काळे यांनी भेट दिली असता या कार्यालयामध्ये ना कृषी अधिकारी ना कोणताही कृषी सहाय्यक आढळून आले नसून त्यामुळे सदर कार्यालयाचे जिल्हा कृषी अधिकारी यांनी चौकशी करून संबंधितावर कारवाई करण्यात यावी अशी मागणी होत आहे. याबाबत अधिक माहिती अशी की रविवार दि.१६ रोजी पाटोदा येथे आमसभा पार पडली यामध्ये कृषी विभागाच्या अनेक तक्रारी या ठिकाणी शेतकऱ्यांनी मांडल्या होत्या त्यानंतर पाटोदा नगरपंचायत चे उपनगराध्यक्ष रोहिदास गीते व सभापती हनुमंत काळे यांनी कार्यालयात काही कामानिमित्ताने केले असता या ठिकाणी कृषी अधिकारी गैरहजर आढळून आले त्याचप्रमाणे कार्यालयात कोणत्याही वरिष्ठ कर्मचारी आढळून आले नसून त्याचप्रमाणे अनेक कृषी सहाय्यकांशी संपर्क साधला असता त्यांचाही आठवड्यातील गैरहजेरी जाणवली असून कृषी सहाय्यक व संबंधित अधिकारी हे मुख्यालय थांबत



नसून शेतकऱ्यांचे अनेक अडचणी निर्माण होत आहेत त्यामुळे याकडे जिल्हा कृषी अधिकारी यांनी तात्काळ लक्ष देऊन संबंधित व कारवाई करावी अशी मागणी होत आहे.

# शिक्षण आणि शिक्षक हाच आशेचा किरण– प्रा.डॉ. उषा माने

## जिजाऊ ज्ञान मंदिर उमरीचे स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न

**दिद्रूड । प्रतिनिधी**

आजची परिस्थिती फार समाधानकारक नाही. संविधानिक मूल्य पायदळी तूडवून , समाजव्यवस्था खिळखिळी करून, अघोरी स्वप्नांच्या गुलाम झालेल्या व्यवस्थेमध्ये, शिक्षण आणि शिक्षक हाच अशेचा किरण असल्याचे प्रतिपादन प्रा. डॉ.उषा माने यांनी केले.त्या जिजाऊ ज्ञान मंदिर उमरी बुद्रुक ता. माजलगाव येथे वार्षिक स्नेहसंमेलनात बोलत होत्या.बाल चिमुकल्यांनी विविध विषयांवरील नाटिका, नृत्य याप्रसंगी उत्साहात व निर्भीडपणे सादर केले. कार्यक्रमाच्या उद्धाटक डॉ.माने म्हणाल्या, राजकारण समाजकारणातील पदे येतात आणि जातात राजसत्ता आणि धर्मसत्ता यांचं प्राबल्य कमी जास्त होत असतं पण आपण



ज्ञान सत्तेचे पाईक आहोत याचं भान शिक्षकांनी ठेवलं पाहिजे.लक्ष्मीच्या पैशाच्या खणखणात सरस्वतीच्या विणेचा झंकार क्षीण होणार नाही. याची जिम्मेदारी शिक्षक म्हणून आपल्या खांद्यावरआहे.राष्ट्राचं चारित्र्य निर्माण करण्याचं काम शिक्षक करतात.आचार विचार आणि उच्चारातून चारित्र्य घडत असतात.ही चरित्र संपन्न माणसं समाजाला दिशा देतात. म्हणून चारित्र्यसंपन्न पिढ्या निर्माण करणे ही आजच्या शिक्षकांची जिवाबदारी आहे. स्नेहसंमेलनाच्या अध्यक्षस्थानी कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक आसाराम घायतिडक,

पान ३ वर

# सिरसाळा भूषण पुरस्कारची घोषणा

## खा. बजरंग सोनवणे, सिने अभिनेत्री निशिगंधा वाड व ज्यू. मकरंद अनासपुरे होणार वितरण

**शंकर घोडके, मल्हारराव डोणगांवकर, शाम सरवदे, अशोक गलांडे, राहुल बुरंगे, तुकाराम देवकर, डॉ. उषा माने, प्रकाश सुरवसे पुरस्काराचे मानकरी**

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

सिरसाळा येथील जनकल्याण शैक्षणिक सेवाभावी संस्था व यशराज पब्लिक स्कुलच्या वतीने देण्यात येणाऱ्या ''सिरसाळा भूषण पुरस्कार २०२५'' या पुरस्काराची घोषणा करण्यात आली असून या पुरस्काराचे वितरण २२ मार्च रोजी खा. बजरंगबाप्पा सोनवणे, सिने अभिनेत्री निशिगंधा वाड व ज्यू. मकरंद अनासपुरे यांच्या सह अनेक मान्यवरांच्या उपस्थिती मध्ये संपन्न होणार असल्याची माहिती अध्यक्ष सिरसाळा भूषण पुरस्कार २०२५ निवड समिती व श्री. जनक साहेबराव उबाळे अध्यक्ष, जनकल्याण बुउद्देशिय सेवाभावी संस्था वाघाळा यांच्या वतीने देण्यात आली आहे.

सिरसाळा व पंचक्रोशी मधे सामाजिक, शैक्षणिक,



सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय व अतुलनीय निस्वार्थी भरीवपणें कार्य करणाऱ्या व्यक्तींच्या कार्याची दखल घेऊन मागील काही वर्षा पासून जनकल्याण बहुद्देशीय शैक्षणिक संस्था वाघाळा व यशराज पब्लिक स्कुलच्या वतीने सामाजिक / शैक्षणिक /सांस्कृतिक /सेवा / आरोग्य सेवा /राजकीय क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तीस ''सिरसाळा भूषण पुरस्कार'' देण्यात येत असून या वर्षी देण्यात येणाऱ्या ''सिरसाळा भूषण पुरस्कार २०२५'' साठी संस्थेच्या वतीने प्रवेशिका मागवण्यात आल्या होत्या.

आलेल्या प्रवेशिका मधून समितीने श्री शंकर ज्ञानोबा घोडके–

पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड–४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक–सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# पोलिसांसमक्ष कॅफेत अश्लील चाळे; चालकावर गुन्हा दाखल

**खेड । प्रतिनिधी**

'ती' सुविधा तिथे होतीच. 'ते' अल्पवयीन मुलीसोबत आले. ज्याने त्याने आपापली जागा पकडली, पडदे लावले. अंधारल्या खोलीत मंद प्रकाशाने जागा घेतली आणि धुंदी चढणार तेवढ्यात कॅफेचालकाची कॉलर पोलिसांनी पकडली, त्यांचे निर्भया पथक साध्या वेशात अगोदरच ग्राहक बनून बसले होते.

राजगुरुनगर शहरातील एका कॅफेमध्ये सोमवारी (दि.१७) दुपारी बारा वाजता घडलेल्या या घटनेनंतर एकच खळबळ उडाली. काही महिन्यांपूर्वी झालेल्या कारवाई नंतर कॅफेमध्ये तेच प्रकार घडत असल्याचे पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे. अल्पवयीन मुलीला कॅफेमध्ये बोलावून तिच्याशी जवळीक साधली..नंतर इंजेक्शन देऊन तिच्यावर पाशवी बलात्कार झाल्याचे ते अंगावर काटा आणणारे प्रकरण राजगुरुनगरकरांच्या डोळ्यांसमोर पुन्हा उभे राहिले.

राजगुरुनगर शहरात किशोरवयीन मुलींना जाळ्यात ओढण्यासाठी कॅफेचा उपयोग केला जात असल्याचे यापूर्वीही समोर आले आहे. कॅफेच्या नावाखाली कॉलेजमधील मुला-मुलींना अश्लील वर्तन करता येईल



अशी संशयास्पद बैठक व्यवस्था आणि स्वैराचार करणे सोपे होईल याची मुभा देणारी ही दुकाने शहराच्या ठरावीक भागात तेजीत आहेत. शाळा, कॉलेजच्या लगत असलेल्या या कॅफेवर पोलिसांची नजर गेली.

पोलिस निरीक्षक प्रभाकर मोरे, निर्भया पथकाच्या स्नेहल राजे, उपनिरीक्षक श्रीकांत गोडगे यांच्या नेतृत्वाखाली पोलिसांनी शहरातील संशयास्पद चार कॅफेंची अचानक झाडाझडती घेतली. त्यात काही कॅफे बंद आढळले. मात्र, पाबळ रस्त्यावर असलेला मैत्री कॅफे सुरू होता. साध्या वेशात पोलिसांच्या पथकातील काही जणांनी कॉलेज सुटण्याच्या वेळेत या कॅफेतील त्या जागा पटकावल्या. पेय, खाद्यांची ऑर्डर दिली. त्यामुळे पोलिस बसल्याचे कोणाच्या लक्षात आले नाही. काही वेळाने कॉलेजची मुले आणि मुली येऊ लागली. त्यांना एकांत मिळावा म्हणून सगळे सुरू झाले.

अशातच कॅफेचालकाला रंगेहाथ पकडण्यात आले. सुजीत ठोंबरे याच्या विरुद्ध अश्लील कृत्य केल्याचा गुन्हा दाखल केला आहे. याबाबत महिला पोलिस पूजा गारगोटे यांनी फिर्याद दिली आहे. महिला पोलिस सहायक निरीक्षक स्नेहल राजे, पोलिस उपनिरीक्षक श्रीकांत गोडगे, पोलिस हवालदार नीलेश कोळसे आदींनी या कारवाईत सहभाग घेतला.

### गाळेधारकांवरही कारवाई होणार

राजगुरुनगर शहरात, जुन्या पुणे-नाशिक महामार्गावर, पाबळ रोड या ठिकाणी अनेक कॅफे उभारण्यात आले आहेत. मुलांना नको ते करायला संधी देणार्या या कॅफेमधून वेगवेगळी पेय तसेच खाद्यपदार्थ विक्री केली जाते. त्यात काही मिसळले जाण्याचीसुध्दा शक्यता असताना जागामालकही त्याकडे दुर्लक्ष करीत असतात. कॅफेमधून इमारत मालकांना मोठ्या प्रमाणात भाडे मिळत असल्यामुळे ते अशा कॅफेंना आपले गाळे भाड्याने देत आहेत. त्यांना याबाबत माहिती असूनही भाड्यापोटी त्याकडे दुर्लक्ष करत आहे. अशा गाळेमालकांवरही पोलिसांनी गुन्हा दाखल करणे गरजेचे असल्याचे शहरात बोलले जात आहे.

# 'स्वारगेट' प्रकरणातील आरोपी वकिलाच्या सहायकाला अपहरण करून मारहाण

पुणे । प्रतिनिधी

स्वारगेट एसटी स्थानकातील शिवशाही बसमध्ये तरुणीवर झालेल्या बलात्काराच्या घटनेने राज्यात खळबळ उडवून दिली होती. याच प्रकरणातील आरोपी दत्तात्रय गाडे याच्या एका वकिलाकडे सहायक म्हणून काम करणाऱ्या वकिलाचे अपहरण करून मारहाण केल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे.

साहिल डोंगरे असे मारहाण झालेल्या सहायक वकिलाचे नाव आहे. तो गाडे याचे वकील वाजेद खान बिडकर यांच्याकडे सहायक वकील म्हणून काम करतो. या हल्ल्याच्या घटनेबाबत वाजेद खान बिडकर यांनीही दुजोरा दिला आहे. त्यांनी साहिल डोंगरे यांचा एक



व्हिडीओ देखील शेअर केला आहे. त्यात डोंगरे सांगत आहेत की, रात्री दहा ते साडेदहाच्या सुमारास एका केस संदर्भात मी हडपसर पोलीस स्टेशन येथे गेलो होतो. एक पक्षकार मला भेटून गेला आणि त्याने मला ५४ हजार रुपये दिले होते. मला सारखे वाटत होते की कुणीतरी माझा पाठलाग करीत आहे.

मी तिथून पेट्रोल संपले म्हणून पाऊण ते एकच्या सुमारास पेट्रोल पंपावर गेलो होतो. रस्त्याच्या कडेला मला कुणीतरी मदत मागितली तिथे गेलो. अचानक मागून एक गाडी आली. मला गाडीत घातले. डोळे उघडले तेव्हा मारहाण करून दिवे घाटात सोडून देण्यात आले. मी स्वत: कसा आलो हे माझे मला माहिती. मारहाण झाल्यानंतर मी स्वत: जखमी अवस्थेत हडपसर पोलीस ठाण्यात जाऊन तक्रार दिली आहे.

# पुणे विद्यापीठात मुलींच्या हॉस्टेलमध्ये धक्कादायक प्रकार! दारुच्या बाटल्या अन् सिगारेटची पाकिटं

**पुणे । प्रतिनिधी**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामधील मुलींच्या वसतिगृहामध्ये मोठ्या प्रमाणावर दारुच्या बाटल्या आणि सिगारेटची पाकिटं आढळून आलेली आहेत. रुममधील फोटो समोर आलेले आहे. या प्रकरणी एका विद्यार्थीनीने वसतिगृह प्रशासनाकडे तक्रार केलेली होती. परंतु त्याकडे साफ दुर्लक्ष केल्याचा प्रकार उघड झाला आहे.

पुणे विद्यापीठातील मुलींच्या वसतिगृहात मोठ्या प्रमाणात दारूच्या बाटल्या सिगरेटची पॉकेटचे फोटो आणि विडिओ समोर आल्याने खळबळ उडाली आहे. वसतिगृहामध्ये वास्तव्य करीत असलेल्या एका विद्यार्थीनीने या सर्व गैरप्रकारची माहिती वसतिगृह महिला अधिकाऱ्याकडे वारंवार केली होती. परंतु संबंधित अधिकाऱ्यांनी कोणती कारवाई केली नाही. त्यानंतर संबंधित विद्यार्थीनी प्रभारी कुलसचिव आणि कुलगुरू यांना पत्र लिहून हा सर्व घटनाक्रम सांगितला आहे.



महत्त्वाचं म्हणजे मुलींच्या वसतिगृह गेटवर बायोमेट्रिक उपकरणे आहेत. असे असताना एवढ्या मोठ्या प्रमाणात दारू आणि इतर नशेच्या गोष्टी आत कशा जातात, असा प्रश्न उपस्थित होतोय. अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या वतीने लेखी पत्रव्यवहार करून याप्रकरणी चौकशी समिती गठित करण्याची विनंती कुलगुरूंना करण्यात आलीय.


या सर्व प्रकरणात जे कोणी दोषी असतील त्या सर्वांवर कठोर कारवाई झाली पाहिजे, अशी मागणी अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेकडून करण्यात आली आहे. मुलींच्या रुममध्ये एवढ्या प्रमाणावर दारुच्या बाटल्या कशा, असा प्रश्न उपस्थित होत आहे. काही बाटल्या संपलेल्या आहेत तर काहींमध्ये दारु शिल्लक आहे. तर ड्राव्हरमध्ये मोठ्या प्रमाणावर सिगारेटची पाकिटं आहेत.

# नारायणगाव येथील कापड दुकानाला भीषण आग; कोट्यवधी रुपयांचे नुकसान

नारायणगाव: नारायणगाव बस स्थानकाजवळ असलेल्या अष्टविनायक वस्त्रालय या कापड दुकानाला मंगळवारी (दि. १८) पहाटे साडेचार ते पाचच्या दरम्यान अचानक आग लागली. आगीमुळे कापड दुकान आगीत भस्मसात झाले. बाजूला असलेल्या वऱ्हाडी मेडिकल या होलसेल दुकानाला देखील आगीचा झळा बसल्या असून त्यांचे देखील सुमारे ७० लाख रुपयांचे नुकसान झाल्याची माहिती सुरेश वऱ्हाडी यांनी दिली.

याबाबत समजलेली माहिती अशी की, धवल चव्हाण यांचे नारायणगाव बसस्थानकासमोर अष्टविनायक वस्त्रालय हे कापड दुकान असून मंगळवारी पहाटे चार ते पाचच्या दरम्यान या कापड दुकानाच्या दुसऱ्या मजल्यावरून धूर दिसल्याची माहिती वैभव मुथा यांनी दुकान मालक यांना दिली. दुकानामध्ये कपडे मोठ्या प्रमाणात असल्याने आगीचा भडका उडाला. त्यामुळे आग आटोक्यात आणणे अशक्य होत होते.

पहाटे पाच वाजता जुन्नर नगरपरिषदेचा पहिला बंब आला त्यानंतर खेड इथून दुसरा बंब आला, तसेच १४ नंबर येथील औद्योगिक वसाहतीच्या माध्यमातून आग नियंत्रणात आणण्याची यंत्रणा उपलब्ध केली. नारायणगावचे उपसरपंच बाबू पाटे, विघ्नहर



कारखान्याचे अध्यक्ष सत्यशील शेरकर आदी मंडळींनी आग आग नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न केला, परंतु आगीचे लोट मोठे असल्याने आग नियंत्रणात आणणे शक्य होत नव्हते.

दरम्यान विघ्नहर कारखान्याने देखील तातडीने पाण्याचे टँकर उपलब्ध करून आग नियंत्रणात आणण्यासाठी कारखान्याचे कर्मचारी उपलब्ध करून दिले. अष्टविनायक वस्त्रालय हे नारायणगाव येथील मोठे कापड दुकान आहे. दुसऱ्या मजल्यावर शॉर्टसर्किट झाल्याने आग लागली असावी असा प्राथमिक अंदाज स्थानिक लोक व्यक्त करीत आहेत. या आगीची माहिती मिळताच नारायणगावचे सहाय्यक पोलीस निरीक्षक महादेव शेलार व त्यांची संपूर्ण टीम घटनास्थळी दाखल झाली होती. या आगीमध्ये धवल चव्हाण या कापड दुकानदाराचे सुमारे पाच कोटी रुपयांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे. तसेच बाजूला सुरेश वऱ्हाडी यांचे वऱ्हाडी मेडिकल हे औषध विक्रीचे मोठे दुकान असून या दुकानाला देखील या आगीचा मोठा फटका बसला आहे. दुकानातील औषधे व गोळ्या तसेच फर्निचर जळाले आहे. अनेक औषधांना झळा लागल्यामुळे ते औषध देखील आता वापरता येणार नसल्याने वऱ्हाडी यांचे सुमारे ७० लाख रुपयांचे नुकसान झाल्याचे त्यांनी सांगितले.

# दयोदय गोशाळेला आंतरराष्ट्रीय शेतकऱ्यांनी दिली सदिच्छा भेट

बारामती : ग्राम परी एम. आर. ए. सेंटर, पाचगणी आणि आंतरराष्ट्रीय शेतकरी संवाद संस्था यांच्या वतीने सात देशांतील सेंद्रिय शेतकरी समूहाने नुकतीच दयोदय गोशाळेला अभ्यास दौऱ्याच्या निमित्ताने भेट दिली. या अभ्यास दौऱ्यात एकूण ३० सेंद्रिय शेतकऱ्यांनी सहभाग घेतला होता. सहभागी देशांमध्ये फ्रान्स, मेक्सिको, सुदान, केनिया, कंबोडिया, बुरुंडी आणि वृंडाएस यांचा समावेश होता. शेतकरी समूहाने दयोदय गोशाळा, कुसुम बाग सेंद्रिय शेती प्रकल्प आणि इतर सामाजिक उपक्रम प्रत्यक्ष पाहून माहिती घेतली. येथील नाविन्यपूर्ण उपक्रमांविषयी कौतुकाची भावना व्यक्त केली.

दयोदय गोशाळेमध्ये ३०० गायींची सेवा केली जाते. गोमातेच्या आहार, लसीकरण, सुरक्षा, निवास व्यवस्था तसेच संरक्षण आणि संवर्धनाबाबत सविस्तर माहिती




मिळाल्यानंतर परदेशी गोपालक अत्यंत आनंदित झाले. त्यांनी गोशाळेतील व्यवस्थापन आणि देखरेख पाहून ती आदर्श गोशाळा असल्याचे मत व्यक्त केले. यावेळी शेतकऱ्यांनी गोशाळेतील अनुभव केंद्र पाहिले आणि या संकल्पनेचे विशेष कौतुक केले. दयोदय गोशाळेचे विश्वस्त श्री. अतुल शहा, सह-संस्थापिका सौ. संगीता शहा, कार्यकारी अधिकारी श्री. बाळकृष्ण कुलकर्णी आणि श्री. राहुल भट यांनी उपस्थित शेतकऱ्यांना गोमूत्र व गोबरापासून तयार केलेले सेंद्रिय लिक्विड खत शेतीसाठी कसे फायदेशीर ठरते याची सविस्तर माहिती दिली. शेतकऱ्यांच्या शंकांचे समाधान करताना, अशा उपक्रमांची त्यांच्या देशात अंमलबजावणी करण्यासाठी मार्गदर्शन करण्यात आले. उपस्थित आंतरराष्ट्रीय शेतकऱ्यांनी आमच्या देशातही असे उपक्रम राबवण्यास आम्हाला प्रेरणा मिळाली असे समाधान व्यक्त केले.

# पीएमपी बसला भीषण आग; ४५ प्रवासी बचावले

खडकवासला: स्वारगेटहून सिंहगड किल्ल्याच्या पायथ्याला खानापूरकडे जाणार्या पीएमपी बसला सोमवारी दुपारी पावणेदोनच्या सुमारास भीषण आग लागली. खडकवासला धरणाजवळील भारतीय लष्कराच्या डीआयडी संस्थेच्या रणगाडा गेटसमोर ही घटना घडली. या आगीत बस जळून खाक झाली. बसचालक फिरोज शेख (वय ४०, रा. हडपसर, शिंदेवाडी) यांनी प्रसंगावधान दाखवून बसमधील सर्व ४५ प्रवाशांना खाली उतरवल्यामुळे जीवितहानी टळली.



याप्रकरणी फिरोज शेख यांनी हवेली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. दुपारी सव्वाएक वाजता ही बस स्वारगेटहून खानापूरकडे निघाली होती. खडकवासला धरणमाथा ओलांडल्यानंतर बसच्या इंजिनने पेट घेतला. त्यामुळे चालक शेख यांनी डीआयडीच्या रणगाडा गेटसमोर तत्काळ बस थांबवली. बसमधील सर्व प्रवासी खाली उतरल्यानंतर काही क्षणातच आगीने रौद्ररूप धारण केले. नांदेड सिटी अग्निशमन दलाचे जवान येईपर्यंत अर्ध्या तासात बस जळून खाक झाली. बसमधील सर्व प्रवासी खानापूर, मणेरवाडी, डोणजे, गोर्हे भागांतील होते.

माजी जिल्हा परिषद सदस्य नवनाथ पारगे म्हणाले की, या दुर्घटनेस पीएमपी प्रशासन जबाबदार आहे. खानापूर, सिंहगड, पानशेत मार्गांवर जुन्या मोडकळीस आलेल्या बस पाठवल्या जातात. त्यामुळे अशा घटना घडत आहेत.

# सिमेंट मिक्सर आणि अज्ञात वाहनाच्या धडकेने दोन दुचाकीस्वार तरुणांचा मृत्यू

**पुणे । प्रतिनिधी**

शहरात सिमेंट मिक्सर आणि अज्ञात वाहनाच्या धडकेने दोन वेगवेगळ्या अपघातांमध्ये दोन दुचाकीस्वार तरुणांचा मृत्यू झाला. या घटना लोहगाव आणि फुरसुंगी परिसरात घडल्या.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दुचाकीस्वार स्वप्नील प्रकाश साळवे (वय-२२, रा. भालकुंड, जि. परभणी) सोमवारी सकाळी लोहगावमधील डी. वाय. पाटील महाविद्यालय रस्त्याने निघाला होता. त्यावेळी भरधाव सिमेंट मिक्सर वाहनाने दुचाकीला पाठीमागून धडक दिली. त्यात स्वप्नील साळवे गंभीर जखमी झाल्याने त्याचा मृत्यू झाला.




याबाबत माधव धोंडिबा साळवे (वय-५३, रा. डोंगरे वस्ती, निघोज, चाकण) यांनी विमानतळ पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यावरून सिमेंट मिक्सरचालक वेंकट गुरप्पा पवार (वय-४५, रा. निरगुडी रस्ता, लोहगाव) याच्यावर गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक अक्षय सोनवणे करीत आहेत.

अन्य एका अपघातात दुचाकीस्वार सूरज शरद धायडे (वय-२३, रा. पॉवर हाऊस, फुरसुंगी फाटा, हडपसर) याचा मृत्यू झाला. सूरज रविवारी रात्री अकराच्या सुमारास घरी निघाला होता. त्यावेळी भरधाव वाहनाने दुचाकीला धडक दिली. त्यात डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने त्याचा मृत्यू झाला. ही घटना हडपसर- सासवड रस्त्यावर फुरसुंगी परिसरात पॉवर हाऊससमोर घडली. या प्रकरणी आकाश शरद धायडे (वय-१९) याने फुरसुंगी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यावरून वाहनचालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक तेहसीन बेग तपास करीत आहेत.

# नागपूरच्या घटनेनंतर पुण्यातील पोलिस बंदोबस्तात वाढ; संवेदनशील भागात गस्त वाढवण्याचे पोलिस आयुक्तांचे आदेश

पुणे । प्रतिनिधी

नागपूर शहरातील महाल भागातील झेंडा चौकात काल रात्री १७ मार्च रोजी दोन गटातील संघार्षाने येथे तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. दोन गटात झालेल्या संर्घषात येथील गाड्यांची तोडफोड आणि जाळपोळ झाली. या घटनेची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी दाखल झाले. जमावाला पांगवण्याठी पोलिसांकडून अश्रूधूरांच्या नळकांड्या फोडण्यात आल्या.

या दरम्यान वरिष्ठ दर्जाच्या पोलिस अधिकाऱ्याच्या हातावर धारधार शस्त्राने हल्ला करण्यात आला. तसेच या घटनेत काही पोलीस कर्मचारी देखील जखमी झाले. या घटनेनंतर आता पुणे शहरात सतर्कतेचे आवाहन पुणे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांच्या वतीने करण्यात आले आहे.

शहरातील बंदोबस्त वाढवण्यात आला असून अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन पोलीस आयुक्तांकडून करण्यात आले आहे.




पुण्यातील पोलीस ठाण्यांच्या प्रमुखांना सतर्कतेचे आदेश देण्यात आले आहेत. तर संवेदनशील ठिकाणांवर गस्त वाढविली असून, रात्रीपासून शहरातील वेगवेगळ्या भागात बंदोबस्त ठेवला आहे. या भागातील घडामोडींवर बारीक लक्ष ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

तसेच गुन्हे शाखेच्या पथकांना गस्त वाढविण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. काही अनुचित घटना प्रकार घडल्यास त्वरीत पोलीस नियंत्रण कक्षाच्या (क्रमांक ११२) संपर्क साधावा, असे आवाहन देखील करण्यात आले आहेत. सोशल मीडियावर अफवा पसरवणाऱ्यांवर कडक कारवाई करण्याचा इशारा देखील देण्यात आला आहे.

# पेठमधील अपहरणप्रकरणी फरारी आरोपीला अटक

मंचर । प्रतिनिधी

पेठ (ता. आंबेगाव) येथे खासगी दवाखान्यातील डॉ. कैलास रघुनाथ वाळे (रा. मंचर, ता. आंबेगाव) यांचे ४ जानेवारी रोजी अपहरण करून त्यांना जीवे मारण्याची धमकी देऊन त्यांच्याकडून एक लाख रुपयांची खंडणी घेतल्याप्रकरणी सहा जणांच्या विरोधात मंचर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला होता. त्यातील चार जणांना मंचर पोलिसांनी अटक केली होती. यातील फरारी असलेला प्रवीण उर्फ डॉलर सीताराम ओव्हाळ (वय ३२, रा. वाळद, ता. खेड) या आरोपीला आळेफाटा (ता. जुन्नर) येथे बसस्थानकावर आळेफाटा पोलिसांनी शनिवारी (ता. १५) अटक केली आहे. आरोपीकडून गावठी पिस्तूल, दोन जिवंत काडतुसे, असा एकूण ५१ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

पोलिसांनी योगेश चौधरी, मनोज कडलग, पवन थोरात, डेली ऊर्फ तुषार टेके या चौघांना पोलिसांनी अटक केली होती. प्रवीण ओव्हाळ व आदिनाथ नाईकरे हे फरारी झाले होते. घडलेल्या गुन्ह्याची गांभीर्यता लक्षात घेऊन पोलिस अधीक्षक पंकज देशमुख, अपर पोलिस अधीक्षक रमेश चोपडे यांच्या मार्गदर्शनाखाली आरोपींचा शोध घेतला जात होता. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक अविनाश शिळीमकर, पोलिस अंमलदार दीपक साबळे, अक्षय नवले, संदीप वारे, राजू मोमीन, मंगेश चिगळे, विक्रम तापकीर, नीलेश सुपेकर यांनी आरोपी ओव्हाळ याला अटक केली. पुढील तपास आळेफाटा पोलिस करत आहेत.

मंचर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, डॉ. वांळे हे दुचाकीवरून मंचरला घरी जात असताना मोटारीने त्यांना पाठीमागून धडक दिली. मोटारीतील तिघांनी त्यांना मारहाण करत जबरदस्तीने मोटारीत बसवून निघोटवाडी जंगलात डोंगरावर नेले. 'तू आम्हाला ओळखतो का? आम्ही सर्व या भागातील भाई आहोत. गुन्हेगारी आमचा पेशा आहे,' असे म्हणत मारहाण करत त्यांचा आक्षेपार्ह व्हिडिओ बनवला. थोरात याने पिस्तुलाने गोळीबार करून, 'आम्ही तुझा खून करायची सुपारी घेतलेली आहे. तुला जीव वाचवायचा असेल, तर आम्हाला २० लाख रुपये द्यावे लागतील,' असे सांगितले. घाबरलेल्या वाळे यांनी, '१५ लाख रुपये देतो. मला काही वेळ द्या,' असे सांगितले. त्यानंतर डॉ. वाळे यांना घोडेगावला नेले. वाळे यांनी शरद बँकेतून एक लाख रुपये रक्कम काढून ओव्हाळ याच्याकडे दिली. त्यानंतर राजगुरुनगर बाह्यवळण रस्त्यावर मोटार थांबवली. तेथे चौधरी व कडलग आले. 'तू नादी लागू नको, आम्ही पोलिस ठाण्यात तुझ्याविरुद्ध विनयभंगाची केस करणार आहोत. केस मिटवायची असेल, तर आणखी दोन लाख रुपये द्यावे लागतील,' असे म्हणत चौधरी याने डॉ. वाळे यांना मारहाण केली. पोलिसांत तक्रार दिली, तर जिवे मारण्याची धमकी दिल्यानंतर रात्री डॉ. वाळे यांना पेठ येथे सोडून दिले. त्यानंतर डॉ. वाळे यांनी मंचर पोलिसांत धाव फिर्याद दाखल केली.